MAY 2013

S	M	T	W	T	F	S
			1	2	3	4
5	6	7	8	9	10	11
12	13	14	15	16	17	18
19	20	21	22	23	24	25
26	27	28	29	30	31	

(२)

रुद्र - इंद्रमुखाने.

चैत्र शु. ११ संवत २०६९
सोमवार २२/४/२०१३

APRIL
22
MONDAY

सप्तमः खण्डः

अथ यत् द्वितीयम् अमृतम् तत् रुद्रा उपजीवन्ति इन्द्रेण मुखेन न वै देवा अश्नन्ति न पिबन्ति एतदेव अमृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥१॥

दुसऱ्या खंडात सांगितलेली दक्षिण भागातील किरणे आश्रय घेतात व यामुळे आदित्य शुक्ल वर्णाच्या दिसतो. या अमृताचे सेवन रुद्रगण करतात. त्याने तृप्त होतात. अर्थात तेही अमृत खात/पीत नाहीत पर त्याच्या दर्शनाने ते तृप्त होतात.
रुद्र इंद्रमुखाने उपजीविका करतात.

त एतदेव रूपम् अभिसंविशन्ति । एतस्मात् रूपात् उद्यन्ति ॥२॥

या रूपानेच ते उदासीन होतात किंवा उत्साहित, उद्यमशील होतात. तृप् - तर्प - तर्पण

स य एतदेवममृतं वेद ------- एतस्मात् रूपात् उदेति ।
स यावद् आदित्यः ------- आधिपत्यं स्वाराज्यं पर्येता ॥३॥

जो अशा प्रकारच्या अमृताचे रहस्य जाणतो तो अकरा रुद्रांपैकी एक होऊन इंद्रमुखाने या अमृताला पाहूनच तृप्त होतो. त्या रूपाला पाहून उदासीन/उत्साहित होतो.
हा आनंद किती काळ मिळतो? सूर्य पूर्वेला उगवून पश्चिमेला मावळतो, त्याच्या दुप्पट वेळ तो दक्षिणेला उगवून उत्तरेला मावळतो.
म्हणजे वसुगणांच्या आधिपत्य कालापेक्षा हा रुद्रगणांचा काळ दुप्पट असतो.

© www.madhaveeraghuveer.com

अथ तृतीय: खण्ड:

अथ यत् तृतीयम् अमृतम् तद् आदित्या: उपजीवन्ति वरुणेन मुखेन । ---------- अमृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥१॥

तिसरे अमृत - आदित्यगण वरुणप्रधान होऊन त्याच्या आधाराने जीवन धारण करतात. अमृत पाहून तृप्त होतात.

न एतदेव रूपम् ---------- एतस्मात् रूपात् उद्यन्ति ॥२॥
स य एतदेवममृतं ---------- उद्यन्ति ॥३॥

ते देव या रूपामुळेच उदासीन/उद्यमशील होतात. जो कोणी अशा प्रकारच्या अमृताला जाणतो तो (बारा) आदित्यांपैकी एक होतो व वरुणमुखाने अमृताला पाहून तृप्त होतो. तपाम्यहमहं वर्ष निगृह्णाम्युत्सृजामि च

स यावद् आदित्यो ---------- स्वाराज्यं पर्येता ॥४॥

आदित्य सूर्य जेवढा उगवून पश्चिमेला मावळतो त्याच्या दुप्पट वेळापर्यंत दक्षिणेला उदय पावून उत्तरेला अस्त होतो. आणि त्याच्या दुप्पट वेळापर्यंत पश्चिमेला उदय पावून पूर्वेला अस्त होत राहतो.
इतका वेळपर्यंत तो आदित्यांच्या आधिपत्याला व स्वाराज्याला प्राप्त होतो.

ही सर्व समाधि (गूढ) भाषा आहे.

© www.madhuraghuveer.com

(४)

MAY 2013
S M T W T F S
1 2 3 4
5 6 7 8 9 10 11
12 13 14 15 16 17 18
19 20 21 22 23 24 25
26 27 28 29 30 31

Service Tax return half yearly
Sept.-Mar.

॥ अथसूक्त चतुर्थम् अमृतं ---------- ईश्वर तृप्यन्ति ॥

चवथे अमृत – मरुद्गण सोमाच्या प्राधान्याने, त्याच्या आश्रयाने जीवन धारण करतात. देव खात-पीत नाही. ते अमृत पाहूनच तृप्त होतात.

© www.madhaveeraghuveer.com

(५)

APRIL
25
THURSDAY

साध्यदेव - ब्रह्ममुखाने

हनुमान जयंती

चैत्र पौर्णिमा संवत २०६९
गुरूवार २५/४/२०१३

MARCH 2013

S	M	T	W	T	F	S
31					1	2
3	4	5	6	7	8	9
10	11	12	13	14	15	16
17	18	19	20	21	22	23
24	25	26	27	28	29	30

दशम: खण्ड:

॥ अथ यत् पञ्चमम् अमृतं ------ ब्रह्मणा मुखेन ॥

पाचवे जे अमृत आहे ते ब्रह्मामुखाने सेवन करून साध्यगण जीवन धारण करतात. ते देव अमृत खातही नाहीत वा पीतही नाहीत. ते अमृत पाहूनच तृप्त होतात.

त एतदेव रूपम् ---------- रूपात् उद्यन्ति ॥२॥
स य एतदेव अमृतं वेद --------- एतस्मात् रूपात् उदेति ॥

ते (साध्यदेव) याच रूपाला पाहून उदासीन होतात किंवा उत्साहित होतात.
जो या प्रकारे त्या अमृताला जाणतो तो ४९ मरुद्गणांपैकी एक होऊन सोममुखाने या अमृताला बघून तृप्त होतो.

स यावत् आदित्यः पश्चात् उदेता पुरस्तात् अस्तमेता द्विस्तावत् उत्तरत उदेता दक्षिणतोऽस्तमेता मरुतामेव तावद् आधिपत्यं स्वाराज्यं पर्येता ॥४॥

आदित्य जेवढा वेळ पश्चिमेला उगवून पूर्वेला अस्ताला जातो त्याच्या दुप्पट वेळ तो उत्तरेला उदित होऊन दक्षिणेला अस्ताला जायला लावतो. तेवढ्या वेळापर्यंत तो या अमृताचा जाणकार मरुद्गणांचे आधिपत्य व स्वाराज्य प्राप्त करतो.

©www.madhaveeraghuveer.com

देवमाणूस

MAY 2013						
S	M	T	W	T	F	S
			1	2	3	4
5	6	7	8	9	10	11
12	13	14	15	16	17	18
19	20	21	22	23	24	25
26	27	28	29	30	31	

चैत्र कृ. १ संवत २०६९
शुक्रवार २६/४/२०१३

APRIL 26 FRIDAY

दशमः खण्डः

अथ यत् पञ्चमम् अमृतम् तत् साध्या उपजीवन्ति ब्रह्मणा मुखेन । न वै देवा अश्नन्ति न पिबन्ति । एतत् एव अमृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥१॥

तसेच जे पाचवे अमृत आहे ते ब्रह्ममुखाने सेवून साध्यगण जीवन धारण करतात. ते देव अमृत खातही नाहीत व पीतही नाहीत. त्या अमृताच्या दर्शनानेच ते तृप्त होतात.

य एतदेव ------ एतस्मात् रूपात् उद्यन्ति ॥२॥
स य एतदेवं अमृतं वेद ------ रूपात् उदेति ॥३

ज्याला हे अमृत कळले तो साध्यांपैकी एक साध्यदेव होतो. (देवमाणूस) तो ही त्या अमृताला पाहून तृप्त होतो. त्या रूपाने तो उदासीन होतो व उद्यमशील होतो.

स यावद् आदित्यः उत्तरतः ------ स्वाराज्यं पर्येता ॥

आदित्याला उत्तरेला उगवून दक्षिणेकडे अस्ताला जायला जी वेळ लागते, त्याच्या दुप्पट वेळ वर उगवून (ऊर्ध्वदिशेला) खाली अस्ताला जाण्यासाठी लागतो. तोवढा काळ हा साध्य बनलेला जाणकार साध्यांचे आधिपत्य व स्वाराज्य प्राप्त करतो.

अशा प्रकारे सूर्याची पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व दिशांकडे जाणारी किरणे ही मधुनाड्या आहेत. व सगुणात्मा कर्मांनी त्याचे अमृत बनते. त्यातही पहिल्यापेक्षा पुढच्याचे फळ दुप्पट होत जाते. त्याना देवांचे सामर्थ्य प्राप्त होते.

!! Shree !!
With Best Compliments From
!! Jai Bajrang !!
Mob.: 9921181809

© www.madhavveeraghureer.com

MARCH 2013

S	M	T	W	T	F	S
31					1	2
3	4	5	6	7	8	9
10	11	12	13	14	15	16
17	18	19	20	21	22	23
24	25	26	27	28	29	30

एकादश: खण्ड:

अथ तत ऊर्ध्व उदेत्य नैव उदेता न अस्तमेति एकल एव मध्ये स्थाता तदेष श्लोक: ॥३१॥

सूर्य आपल्या उदय व अस्ताने जीवांवर अनुग्रह करतो. त्याच्या पापांचा क्षय झाल्यानंतर ते सूर्याशी एकरूप होतात.

असा जो साधक त्याच्याशी एकरूप झाले असल्याने त्यांच्या दृष्टीने उदय-अस्त होणे शक्यच नाही. तो एकटाच मध्येच आपल्यातच स्थित असा राहील.

आपण पृथ्वीवर असतात. सूर्योदय सूर्यास्त झाले असे वाटते. वस्तुतः सूर्य स्थिरच आहे. ब्रह्मलोकाप्रत पोहोचल्यावर ही सापेक्षता उरतच नाही.

न वै तत्र न निम्लोच न उदियाय कदाचन ।
देवास्तेनाहं सत्येन मा विराधिषि ब्रह्मणेति ॥२॥

ऋषी शिष्याला सांगतात - मी ज्या ब्रह्मलोकातून आलो आहे तिथे सूर्योदय-सूर्यास्त नाही. याला सर्व देव,

तुम्ही साक्षी आहात. मी हे सत्यवचन बोलत आहे. (ऋतं वच्मि, सत्यं वच्मि) (प्रतिजाने प्रियोऽसि मे) मी ब्रह्माच्या स्वरूपाच्या विरुद्ध न व्हावे. मला ब्रह्मप्राप्ति होऊ दे. ब्रह्मप्राप्तीत अडचण येऊ देऊ नको.

मा मा ब्रह्म निराकुर्यात ।

© www.madhaveeraghuveer.com

न ह वा अस्मा उदेति न निम्लोचति सकृत् दिवा हैवास्मै भवति य एतामेवं ब्रह्मोपनिषदं वेद ॥

अशा रीतीने जो ब्रह्मोपनिषद जाणतो. वेदांचे रहस्य जाणतो. (य एवं वेद, इत्युपनिषद) त्याच्यासाठी सूर्य उदय पावत नाही किंवा त्याचा अस्तही होत नाही. त्याच्यासाठी सदैव लखलख प्रकाशाचा सदैव दिवसच असतो कारण तोच स्वत: सूर्यासारखा तेजस्वी झालेला असतो.

तत हि एतत ब्रह्मा प्रजापतये उवाच प्रजापति मनवे मनुः प्रजाभ्य: तत हि एतद उद्दालकाय आरुणये ज्येष्ठाय पुत्राय पिता ब्रह्म प्रोवाच।

हे जे मधुज्ञान आहे ते ब्रह्मा हिरण्यगर्भाने विराट प्रजापतीला सांगितले. प्रजापतीने हे रहस्य मनुला सांगितले. मनुने पुढील प्रजाजना सांगितले. तसेच आपल्या ज्येष्ठ पुत्राला म्हणजे अरुण पुत्राला उद्दालकाला अरुणाने उपदेश केला ब्रह्मविज्ञानाचा उपदेश.

परंपरेने प्राप्त विद्येचे महत्त्व अधिक असते. त्यामुळेच वेद. वेदांत अजूनही टिकले आहेत. काळाच्या ओघात ते सिद्ध झाले हाच त्यांच्या महत्त्वाचा पुरावा आहे. शिवाय प्रत्येक हस्तांतरणाच्या वेळी सांगणाऱ्याचे पुण्यही त्याला जोडले जाते.

हे मधुविज्ञान असेच परंपरेने सिद्ध झाले आहे.

इदं वाव तद् ज्येष्ठाय पुत्राय पिता ब्रह्म प्रब्रूयात् प्रणाय्याय अन्तेवासिने ॥५॥

:: पित्याने आपल्या ज्येष्ठ पुत्राला किंवा आपल्या योग्य शिष्याला ही ब्रह्मविद्या द्यावी. इतर त्याला देऊ नये.

इदम् अथर्वशिरो शिष्याय न देयम् ॥
न चा शुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥
चुकीच्या व्यक्तीकडे हे ज्ञान गेले तर त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. कारण हे गुह्यज्ञान आहे.

न अन्यस्मै कस्मैचन यद्यपि अस्मै इमाम् अद्भिः परिगृहीतां धनस्य पूर्णां दद्यात् एतत् एव ततः भूयः इति एतत् एव ततः भूयः इति ॥६॥

कशाच्याही बदल्यात अगदी धनधान्यसंपन्न पृथ्वी किंवा समुद्राने वेढलेली संपूर्ण पृथ्वी जरी कोणी देऊ केली तरीदेखील ही विद्या कुणालाही देऊ नये. कारण ही या सर्वांपेक्षासुद्धा श्रेष्ठ आहे मौल्यवान आहे. भूय - श्रेष्ठ आहे.
द्विरुक्ति आदर दर्शविते व समाप्ति सूचित करते.

✡ सर्व इंद्रियांना प्रसन्न करून घ्यावे, तृप्त करावे.

© www.madhaveeraghuveer.com

द्वादश: खण्ड:

मागील अध्यायात ब्रह्मविद्या किंवा मधुविद्येबद्दल विवेचन केले आहे. आता या अध्यायातील या बाराव्या खंडापासून गायत्रीपासून ब्रह्माचे निरूपण कसे केले जाते त्याविषयी सांगितले आहे.

प्रमुख छंद सात आहेत.

गायत्री, उष्णिक, अनुष्टुभ, बृहती, पंक्ती, त्रिष्टुभ, जगती ....

प्रातः सवन — गायत्री — २४ अक्षरे
माध्यंदिन — त्रिष्टुभ — ४४ अक्षरे
तृतीय /सायंसवन — जगती — ४८ अक्षरे.

गायत्री हा सर्वश्रेष्ठ छंद आहे. त्याला भगवंतांनी आपली विभूति मानले आहे.

ऐतरेय ब्राह्मण ......

देवांनी एकदा गायत्री, त्रिष्टुभ व जगती या छंदांना सोम आणण्यासाठी पाठवले. त्रिष्टुभ व जगती वाटेतच थकून गेले. त्यामुळे त्रिष्टुभचे एक अक्षर आणि जगती छंदाची तीन अक्षरे गळून पडली. गायत्री छंद मात्र सोमापर्यंत पोहोचला. त्याने सोमाच्या रक्षकांशी युद्ध करून देवांपर्यंत सोम घेऊन आला. वाटेत थकून पडलेल्या त्रिष्टुभ व जगती छंदांना त्यांची गळलेली अक्षरे देऊन त्यांना पुन्हा पूर्णरूप प्राप्त करून दिले. वस्तुतः गायत्री मंत्र हा सवितृ म्हणजे सूर्याचा मंत्र असून त्याचा छंद गायत्री आहे. जशी सवितृपासून या विश्वाची उत्पत्ति झाली तशीच गायत्रीपासून वाक् व विश्व यांची निर्मिती झाली. गय म्हणजे प्राण आणि त्री म्हणजे रक्षण करणारी, तारणारी अशी विद्या!

गायन्तं त्रायते इति गायत्री ।

MAY
2
THURSDAY

चैत्र कृ. ८ संवत २०६९
गुरुवार २/५/२०१३

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

गायत्री वा इदं सर्वं भूतं यदिदं किंच वाग्वै गायत्री वाग्वा इदं सर्वं भूतं गायति च त्रायते च ॥१॥

खरोखर गायत्री म्हणजेच ही सर्व भूते: अर्थात जन्माला आलेले सर्व – जे काही 'हे' म्हणून (इदम् म्हणून) दाखवता येते ते सर्व गायत्रीचेच रूप आहे. थोडक्यात ही सर्व चराचर सृष्टी म्हणजे गायत्रीच आहे. सर्व प्राणी वाणीनेच जाणले जातात. सर्व व्यवहार वाणीनेच होतो म्हणूनच नेहमी गायत्रीचेच उच्चारण होते. गायत्रीच सर्वांचे रक्षण करते.

या वै सा गायत्रीयं वाव सा येयं पृथिव्यस्यां हि इदं सर्वं भूतं प्रतिष्ठितमेतामेव नातिशीयते ॥२॥

पृथ्वी हीच गायत्री आहे. पृथ्वीवरील सर्व भूते, प्राणी, जन्माला आलेले सर्व पृथ्वीवर स्थित आहेत. ते सर्वजण कधीच तिचे अतिक्रमण करत नाहीत.

© www.madhaveeraoluveer.com

यद्वै तत्पुरुषे शरीरमिदं वाव तद् यद् इदम् अस्मिन् अन्तःपुरुषे हृदयम् अस्मिन् हि इमे प्राणाः प्रतिष्ठिताः। एतत् एव न अतिशीयन्ते॥४॥

ते जे पुरुषातील (पुरुषाने धारण केलेले) शरीर आहे तेच खरोखर पृथ्वी म्हणजे गायत्री आहे. याच्याच आंत हृदय आहे, ज्यात हे प्राण प्रतिष्ठित झाले आहेत. व ते प्राण हृदय सोडून कुठेही जात नाहीत. म्हणून शरीरप्रमाणे हृदय ही गायत्रीच आहे.

सा एषा चतुष्पदा षड्विधा गायत्री। तत् एतत् ऋचा अभ्यनूक्तम्॥५॥

गायत्री छंदात चार चरण व सहा पदे असतात. थोडक्यात गायत्री चार चरणांची व सहा प्रकारची असते. सहा प्रकार - वाक्, भूत, पृथ्वी, शरीर, हृदय व प्राण हे सहा प्रकार तिच्यातील सहा अक्षरांप्रमाणे आहेत. प्रत्येक चरणात सहा-सहा अक्षरे असतात. ४ x ६ = २४

गायत्री ही प्रत्यक्ष ब्रह्मच आहे. तीच पृथ्वी व तीच हे शरीर आहे. या माध्यमातून ब्रह्मापर्यंत पोहोचता येते.

गाम् आविश्य (अ. १५) इथे पृथ्वीमध्ये प्रवेश करुन

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

तावान् अस्य महिमा । ततः ज्यायान् च पुरुषः । अस्य पादः सर्वा भूतानि त्रिपादस्य अमृतम् दिवि इति ॥

वर वर्णन केलेली ही गायत्री ब्रह्माची महिमा आहे. त्याहून उत्कृष्ट पुरुष, परब्रह्म, पुरुषोत्तम आहे. या विश्वातील दिसणारे सर्व जगत - भूतमात्र म्हणजे या परब्रह्माचा एक पाद आहे. याचे त्रिपाद अमृत हे द्युलोकात स्थित आहे. म्हणजेच जेवढे इंद्रियगोचर आहे तो या परब्रह्माच्या एका लहानशा भागाचे व्यक्तीकरण आहे. अजून न दिसणारा, माहिती नसलेला पुष्कळसा भाग शिल्लक आहे. तो या सर्व ब्रह्मांडाला व्यापून पुन्हा दशांगुळे शिल्लक आहेच. एकांशेन स्थितो जगत । असे विभूतियोगाचा समारोप करताना भगवंत म्हणतात. पुरुषसूक्तात देखील त्याच्या विराट स्वरूपाचे यथार्थ वर्णन आहे.

यद्वै तद् ब्रह्म इति इदं वाव तद्यो अयं बहिर्धा पुरुषात् आकाशो । यो वै स बहिर्धा पुरुषात् आकाशः ॥ ७ ॥ अयं वाव स योऽयमन्त पुरुष आकाशो यो वै

सोऽन्तः पुरुषः आकाशः ॥ ८ ॥ अयं वाव स योऽयमन्तर्हृदय आकाशः तद् एतद् पूर्णम् अप्रवर्ति पूर्णम् अप्रवर्तिनीं श्रियं लभते य एवं वेद ॥ ९ ॥

आकाश हे देखील ब्रह्माचेच रूप आहे. इथे भूताकाश, देहाकाश व हृदयाकाशाचे वर्णन केले आहे. (क्रमशः)

29 November 2019

MAY
7
TUESDAY

चैत्र कृ. १३ संवत २०६९
मंगळवार ७/५/२०१३

TDS payment of April

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

त्रयोदश: खण्ड:

तस्य ह वा एतस्य हृदयस्य पञ्च देवसुषय: स योऽस्य प्राङ्ग सुषि: (छिद्र) स: प्राण: तत् चक्षु: स: आदित्य: । तत् एतत तेज: अन्नाद्यम् इति उपासीत। तेजस्वी एव अन्नाद: भवति य एवं वेद॥१॥

अशा या हृदयाची पाच देवद्वारे (छिद्रे) आहेत. पूर्वेकडील द्वार म्हणजे प्राण, तोच डोळा, तोच आदित्य त्याची तेज, अन्न ह्० प्रकारे सेवा करावी. जो हे जाणतो, तो तेजस्वी पुरुष होऊन पुष्कळ अन्न खाण्यास समर्थ होतो.

हृदयाकडून स्वर्गाकडे जाण्यासाठी पाच द्वारे आहेत. त्या पाचे द्वारपालांना खूश केले तर स्वर्गात सुखाने जाता येईल म्हणून पूर्वेचे द्वारपाल - प्राण, चक्षु व आदित्य यांच्या उपासनेने स्वर्गप्राप्ति होईल. व गौण फल म्हणजे तो तेजस्वी होईल. व अन्न खाण्यास समर्थ होऊन आरोग्यसंपन्न होईल.

अशाच प्रकारे पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व

पूर्व	प्राण	डोळा व आदित्य	तेज व अन्न
दक्षिण	व्यान	कान व चंद्रमा	श्री व यश
पश्चिम	अपान	वाणी व अग्नि	ब्रह्मवर्चस अन्नाद्य
उत्तर	समान	मन व पर्जन्य	कीर्ति, शरीरसौष्ठव
ऊर्ध्व	उदान	वायु व आकाश	ओज व मह:

© www.madhaveeradhuveer.com

ते वा एते पञ्च ब्रह्मपुरुषाः स्वर्गस्य लोकस्य द्वारपाः स य एतानेवं पञ्च ब्रह्मपुरुषान् स्वर्गस्य लोकस्य द्वारपान् वेदास्य कुले वीरो जायते प्रतिपद्यते स्वर्गं लोकं य एतानेवं पञ्च ब्रह्मपुरुषान् स्वर्गस्य लोकस्य द्वारपान्वेद ॥६॥

याप्रमाणे हे पाच हृदयस्थ ब्रह्माचे सेवक आहेत. हृदयस्थ स्वर्गलोकांचे द्वारपाल आहेत. या पाच ब्रह्मसेवक द्वारपालांना जो जाणतो त्याच्या कुळामध्ये वीरपुरुष निर्माण होतो. या पाच ब्रह्मसेवकांना जाणणारा स्वर्गलोक प्राप्त करतो.

मागील पिढ्यांच्या पुण्याईवर पुढची संतति ठरते असते. सुप्रजनन - गृहस्थाश्रमाचा मुख्य उद्देश होता.

समर्थ रामदासस्वामी - मागील २२ पिढ्यांमध्ये सूर्यनारायण व श्रीरामचंद्राची भक्ती होती.

श्रीरामांना रघुवंशाचे अधिष्ठान होते.

अज - दिलीप -

गोब्राह्मण प्रतिपालक - शिवाजी महाराज.

आंब्याचे झाड आजोबा लावतात तेव्हा नातवंडांना आंबे खायला मिळतात. फळ प्रत्यक्ष पहायला मिळाले नाही तरी पेरत रहावे. जोपर्यंत पृथ्वीवर कोणीतरी तुमच्या सत्कर्माचे स्मरण करत असेल तोपर्यंत निश्चित स्वर्गलोकात वास्तव्य लाभते. त्यामुळेच समर्थ म्हणतात,

सत्कर्मयोगे वय घालवावे
सर्वांमुखी मंगल बोलवावे ॥

© www.madhaveeraghuveer.com

MAY

9

THURSDAY

IMP.

चैत्र अमावास्या संवत २०६९

गुरुवार ९/५/२०१३

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

★ या सहा मंत्रांमध्ये डोळे, कान, वाणी, मन व प्राण यांना हृदयस्थ आत्म्याचे द्वारपाल म्हटले आहे. साधकाला साधन करीत असताना या पंचकाला ताब्यात तरी घ्यावे लागते किंवा त्यांना भगवंताचे वळण तरी लावावे लागते. पहिला योगमार्ग कठीण आहे कारण सतत पहारा ठेवावा लागतो. परंतु दुसरा भक्तिमार्ग प्रपंचिक माणसाला सहज साधणारा आहे. व श्रेयस्कर आहे. कारण संसारी माणसाला आपला व्यवहार बिघडू न देता या पंचकांना भगवंताकडे वळवता येते.

केवळ भगवंताला आवडेल तेच पहायचे, ऐकायचे, बोलायचे, चिंतन करायचे हे सोपे नसले तरी फारसे अवघडही नाही. आणि हा अभ्यास (सराव) वाढवत नेल्यास हे द्वारपाल भगवंताखेरीज इतर कोणालाही ~~[illegible]~~ आपल्या हृदयाकडे फिरकू देत नाहीत. एकदा कां वाणीला नामाचे वळण लावले की प्राण तिकडे आपोआप वळतो. नाम आणि नामी एकच आहेत.

घेई घेई माझे वाचे।
गोड नाम विठोबाचे॥ — मधाचे बोट
डोळे तुम्ही घ्या हो सुख
पहा विठोबाचे मुख॥

© www.madhaveeraguruveer.com

अथ यदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते विश्वतः पृष्ठेषु सर्वतः पृष्ठेषु अनुत्तमेषु लोकेषु इद वाव तद्यदिद अस्मिन् अन्तः पुरुष ज्योतिः ॥७॥

आता या स्वर्गलोकाच्या पलीकडे, सर्व संसारापलीकडे जी ज्योति उत्तम परमात्म्याच्या सान्निध्य उत्तम लोकात प्रकाशमान आहे ती ज्योति पुरुषाच्या अंतर्यामी आहे.
तेजस्वी परब्रह्म, सर्वांच्या वर आहे. तीच ज्योति प्रत्येक हृदयामध्ये नांदत असते. अध्याय १३ १५, १८

हृदि सर्वस्य विष्ठितम् । सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो।
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।

जो अति दूर आहे तोच अति जवळ आहे. दूरस्थं चान्तिके

तस्य एषा दृष्टिर्यत्रैतदस्मिन् ------ य एवं वेद ॥८॥

ही जी ज्योति प्रत्येकाच्या अंतर्यामी आहे तिला जाणायचे कसे? कोणत्या साधनांनी? तिला पहाता किंवा ऐकता येते का? तिच्या अस्तित्वाची खात्री पटण्यासाठी उपाय कोणता?

आपले शरीर ९८.५° एवढ्या उष्णतेने गरम असते हे आपल्याला जाणवते (म्हणजेच दिसते) तीच याची दृष्टी आहे.
कान दाबून जो मोठा आवाज / गर्जना ऐकू येते किंवा प्रचंड अग्नि पेटला असल्याप्रमाणे जो आवाज येतो तो याची श्रुति आहे. दृष्टी व श्रुति या रूपाने याची उपासना करतो हे जो जाणतो तो दिव्य दृष्टीने व दिव्य श्रुतिने युक्त होतो.
(दूरदर्शन व दूरश्रवण) | गुरुदेव रानडे - पहाट घंटानाद (योगनारावळी)

• नाद किंवा प्रकाशरूपाने आत्म्याची उपासना करावी.

©www.madhavaveeraghuveer.com

IMP

★ आपली इंद्रिये हा आपल्या देहाचा भाग आहेत. नाद व प्रकाश कान व डोळ्यांचा धर्म आहे. देह पंचमहाभूतांचा बनलेला असला तरी पंचभूते सूक्ष्म तन्मात्रांपासून निर्माण होतात. जड कान व डोळ्यांना जड नाद व प्रकाश अनुभवता येतो. परंतु सूक्ष्म सृष्टिमध्ये सूक्ष्म इंद्रियांना सूक्ष्म नाद व प्रकाश अनुभवाला येतो. त्याचप्रमाणे मनातील सूक्ष्म वृत्तींना देखील सूक्ष्म आकार व त्यांच्या गुणांप्रमाणे सूक्ष्म रंगही येतो. उदा. द्वेषाचे तीक्ष्ण बाणासारख्या विचारांचा रंग लालभडक असतो. प्रापंचिक प्रेमाच्या विचारांचा रंग गुलाबी असतो. भगवंताच्या भक्तीचा रंग कमळाचा आकार घेतल्याने फिका निळा असतो. शुद्ध (निर्गुण) भक्तीचा रंग धवल असतो. त्याचप्रमाणे अंतर्यामी निर्माण होणाऱ्या नादांना अनाहत ध्वनि म्हणतात. समुद्राच्या लाटांची गाज, मेघांचा गडगडाट, नगाऱ्याचा आवाज, घंटानाद, घुंगरांचा आवाज बासरीचा आवाज असे अनेक आवाज ऐकू येतात.

साधकाची इंद्रिये साधनांनी सूक्ष्म बनू लागली की सूक्ष्म प्रकाश दिसतो. किंवा अनाहत ध्वनि ऐकू येतो. अर्थात हे प्रकृतिधर्मानुसार घडत असते. कारण प्रत्येकाच्या शरीरात

पंचमहाभूतांचे प्रमाण सारखे नसते.

आकाशतत्त्व अधिक असेल तर सूक्ष्म नाद, तेज तत्त्व अधिक असेल तर प्रकाश दिसतो. भगवंताकडे जाण्याच्या दृष्टीने या पायऱ्या असल्या तरी ते सर्वस्व नाही. मार्ग योग्य असल्याचा विश्वास यातून मिळतो. मात्र केवळ त्याच्या नादी लागल्यास परमार्थात नुकसानही होऊ शकते किंवा ज्यांना याचा अनुभव येत नाही, त्यांचा मार्ग चुकला असेही नसते. आपली चित्तवृत्ती आत वळवून तिथेच शांतपणे राहू लागणे हेच प्रगतीचे खरे चिन्ह आहे. त्यासाठी ॐकार या नादब्रह्माची उपासना करावी.

– शांडिल्यविद्या –

(गीता ३१.१३)

चतुर्दश: खण्ड: ।

सर्वं खल्विदं ब्रह्म । हे महावाक्य यात आले आहे.
सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलान इति शान्त उपासीत । अथ
खलु क्रतुमय: पुरुषो यथा क्रतु: अस्मिन् लोके पुरुषो
भवति तथा इत: प्रेत्य भवति स क्रतुं कुर्वीत ॥ १ ॥

हे जे जे दिसते आहे ते सर्व जग ब्रह्मापासून (तत्+ज) उत्पन्न झाले आहे व (तत्+ल म्हणजे) त्यातच लीन होणार आहे. त्यातच त्याचा व्यवहार चालतो. थोडक्यात उत्पत्ती + स्थिती + लय - त्यानेच विश्वाकार घेतला आहे. या विचाराने शांत होऊन त्याची उपासना करावी.

मनुष्य हा क्रतुमय म्हणजे संकल्प करणारा हेतुमय असतो. निश्चयात्मक असतो त्यामुळे या जगात तो जे संकल्प करतो, इच्छा करतो त्या लोकी जाऊन तो तसाच होतो ज्या हेतूने तो जगतो त्यानुसार मृत्युनंतर तसेच फळ मिळते.

यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ।
असे हो जया अंतरी भाव जैसा
वसे हो तया अंतरी देव तैसा ।

☆ परमात्मा सर्वव्यापी Omnipresent आहे. सच्चिदानंद आहे. परमात्मा आनंदरूप आहे तो सर्वस्वी स्वतंत्र आहे त्या आनंदाला भर आल्याने तो ओसंडू लागला व त्याचा परिणाम म्हणून या विश्वाची निर्मिती झाली. समुद्राची लाट समुद्रातूनच निर्माण होते, त्या पाण्याचाच आकार घेते व पाण्यामध्येच विलीन होते. पाण्याशिवाय वेगळे लाटमध्ये काहीच नसते. तसेच या विश्वात परमात्म्यावाचून काहीच नाही.

With Best Compliments From

Nagraj N. Jain

©www.madhaveeraghu...com

हे विश्व आनंदातूनच उत्पन्न झाले, आनंदरूपानेच जगते व आनंदातच विलीन होते. पण त्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी आपण समर्थ बनायला हवे.

आनंद अत्यंत सूक्ष्म, शांत व सर्वव्यापी असल्याने आपले मन साधनाने तसे बनते म्हणजे विश्वाच्या या घडामोडीत आनंदाचा विकास अनुभवता येईल.

ईश्वर आनंदस्वरूप असल्याने या सृष्टीत घडणारी घटना त्याच्याच इच्छेने घडत असेल तर ती चांगलीच असणार. अशी वृत्ती ठेवण्याचा अभ्यास केला तर हळूहळू मी पणाची मर्यादा ओलांडता येईल व वृत्ति शांत होऊन ब्रह्माची उपासना घडेल. मानवी दृष्टीला जे दिसते तेच सर्व बरोबर असा आग्रह धरायचाच नाही. कारण मानवी दृष्टीच्या पलीकडे एक दृष्टी असते. तिला प्रतिभा म्हणतात.

जे न देखे रवि ते ते देखे कवि।

पूर्ण प्रतिभावंत पुरुषाला आत्मज्ञानी म्हणतात. सर्वच संत कवी असतात परंतु सर्व कवी संत नसतात.

माणसाचे माणूसपण हे त्याच्या कृतीवर अवलंबून नसून हेतूवर अवलंबून असते. विहीर-गोड्या पाण्याची जर असेल तर चांगली मग ती चांगली बांधलेली नसेल तरी।

तसेच कर्माचा हेतू शुद्ध (निस्वार्थीपणाचा) नसेल तर कितीही मोठे काम केले तरी ते कल्याणकारक नसते. त्याउलट भगवंताचा हेतू मनात असून केलेले साधेसे कर्म त्याला प्रिय ठरते. ते आत्म्यापर्यंत पोहोचते. व त्यातूनच साधकाची साधना वाढीला लागते. कर्माच्या हेतुनुसार मरणोत्तर अवस्थेत मनाची स्थिती राहते.

© www.madhuraveer.com

मनोमयः प्राणशरीरो भारूपः सत्यसंकल्प आकाशात्मा सर्वकर्मा सर्वकामः सर्वगन्धः सर्वरसः सर्वम् इदम् अभ्यात्तो अवाकी अनादरः ॥२॥

जो मनोमय आहे, प्राणशरीर आहे, भारूप आहे, सत्यसंकल्प आहे, आकाशशरीर आहे, सर्व कर्मा, सर्वकाम, सर्वगन्ध, सर्वरस, सर्वत्र व्याप्त, वाकरहित व संभ्रमरहित असा तो आहे.

मन, त्याच्यामुळेच मनन करते. जाणीव म्हणजेच ज्ञ शक्ती तोच आहे. क्रियाशक्तीने युक्त असे* प्राण किंवा लिंगशरीर तोच आहे. भा- दीप्ति, चैतन्य तोच आहे. त्याचे संकल्प सत्य असतात. आकाशाप्रमाणे सूक्ष्म सर्वव्यापी तोच आहे. त्याला रूप नाही. तो अरूप आहे.

आसपास पाहूनी, तोचि भाग्यवंत
निसर्गात [illegible] राहे अनादि अनंत॥

सर्व कर्मांचा तो कर्ता आहे. सर्व गंध, सर्व रस तोच आहे. तो न बोलणारा आहे. त्याच्याकडे कोणतेही इंद्रिय नाही

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्।

तो संभ्रमरहित (अनादर) व आग्रहरहित आहे. तो आप्तकाम असल्याने त्याला कशाचाही आग्रह (इच्छा) नाही.

एष मे आत्मा ------------- ज्यायानेभ्यः लोकेभ्यः ॥३

अणुरेणिया थोकडा तुका आकाशाएवढा।
साळीहून, जवाहून, मोहरीहून, सावाहून अत्यंत लहान आहे. तरीदेखील या पृथ्वीहून, अंतरिक्ष, द्युलोकापेक्षा मोठा आहे.
सर्व व्यापून दशांगुळे उरला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

MAY
16
THURSDAY

वैशाख शु. ६ संवत २०६९
गुरुवार १६/५/२०१३

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

सर्वकर्मा सर्वकामः सर्वगन्धः [illegible] इति ह स्माह शाण्डिल्यः

[illegible]

सर्वकर्मा, सर्वकाम, सर्वगंध, सर्वरस, सर्वांना सर्व बाजूंनी व्यापणारा वाक्‌रहित, आग्रहशून्य असा जो माझा आत्मा हा हृदयामध्ये स्थित आहे. हेच ब्रह्म आहे. शरीराने तो अंतरात्मा वेढलेला असल्याने भिन्न भासत असला तरी, तो भिन्न नाही. शरीरत्यागानंतर मी याच्याशीच एकरूप होणार आहे.

अशी ज्याची खरोखर श्रद्धा असेल तो त्याप्रमाणे खरोखर ब्रह्मस्वरूपच होईल असे शांडिल्यमुनी म्हणतात.

अहं ब्रह्मास्मि — जीव मुळात ब्रह्मस्वरूप आहे. हा सिद्धांत स्पष्टपणे सांगितला आहे.

देह, मन, बुद्धि हे सर्व साधनांनी हळूहळू शुद्ध करून परमात्मस्वरूप करणे हेच अध्यात्माचे सार समजावे.

मन लावून साधन करत गेले तर केवळ जडदेहापर्यंत पसरलेली जाणीव हळूहळू आत जाते व नंतरशी ती सूक्ष्म होत जाते एकाग्र होत जाते. अशाच प्रकारे अंतिमतः ती आनंदमय कोशापर्यंत पोहोचली की अनुरूप प्रकाशमय आत्म्याचे दर्शन घडते.

[illegible]

© www.madhavigrijwar.com

४ डिसेंबर २०१८

पञ्चदशः खण्डः

या खंडामध्ये हे सर्व विश्व म्हणजे एक मोठा कोश (खजिना) आहे, अशी कल्पना केली आहे. भूमि, दिशा, वायु, प्राण, अंतरिक्ष ह्० विश्वातील शक्ती आहेत. त्यांना शरण जाऊन त्यांची उपासना करावी असे यात सांगितले आहे. यात पुत्राच्या आयुष्यासाठी उपासना व जप सांगितला आहे.

अन्तरिक्षोदरः कोशो भूमिबुध्नो न जीर्यति दिशो ह्यस्य स्रक्तयो द्यौरस्योत्तरं बिलं स एष कोशो वसुधानस्तस्मिन्विश्वमिदं श्रितम् ॥१॥

सर्व धागरीत संपत्ती ठेवत असत. अंतरिक्ष हे या कोशाचे उदर आहे. त्यात सर्व काही सामावलेले आहे. याच्या तळ भूमि आहे. हा कोश कधी जीर्ण होत नाही. नाश पावत नाही. दिशा या कोशाचे कोन आहेत. द्युलोक या कोशाचे वरचे तोंड आहे. या कोशामध्ये सर्व प्राण्यांच्या कर्मफळाचे धन भरलेले आहे.
सर्व विश्व या कोशातच सामावलेले आहे.

तस्य प्राची दिग्जुहूर्नाम सहमाना नाम दक्षिणा राज्ञी नाम प्रतीची सुभूता नाम उदीची तासां वायुर्वत्सः स य एतमेवं वायुं दिशां वत्सं वेद न पुत्ररोदं रोदिति सोऽहमेतमेवं वायुं दिशां वत्सं वेद मा पुत्ररोदं रुदम् ॥२॥

पूर्व — जुहू, दक्षिण - सहमाना, पश्चिम - राज्ञी, उत्तर - सुभूता या चार दिशांचे वत्स म्हणजे वायू. जो अशाप्रकारे वायुला दिशांच्या वत्सरूपाने जाणतो त्याला पुत्रासाठी रुदन करावे लागत नाही. त्याच्या पुत्राला अकालमृत्यु येत नाही. दीर्घायुष्यी होतो

मी याप्रकारे वायुला वत्सरूपाने जाणतो म्हणून माझ्यावर पुत्रशोक करण्याचा प्रसंग येणार नाही.

१. जुहू - पूर्वाभिमुख होऊन हवन करत असत म्हणून हे नाव पडले
२. सहमाना - दक्षिणदिशा यमाची दिशा. पापकर्माचे फळ सहन करावे लागते
३. राज्ञी - प. वरुणाची दिशा. पश्चिमेला लाली - रंगवैभव ∴ राज्ञी
४. सुभूता - कुबेराची उत्तर दिशा - वैभवसंपन्न
वायू दिशांमध्येच उत्पन्न होतो ∴ तो दिशांचा वत्स आहे.

अरिष्टं कोशं प्रपद्ये अमुना - - - - - - स्वः प्रपद्ये अमुना अमुना ॥३॥

या मंत्रातील 'अमुक' च्या ठिकाणी आपल्या मुलाचे नाव घ्यावे. त्याच्या सहित मी अरिष्ट (अविनाशी) कोशाला, प्राणांना, 'भूः' ला 'भुव' ला व स्वतः ला शरण आलो आहे.

स यदोवाच प्राणं प्रपद्य - - - - - - - - तेनैव तदवोचम् ॥४॥
अथ यदवोचं भूः प्रपद्य - - - - - - - - इत्येव तदवोचम् ॥५॥
अथ यदवोचं भुवः प्रपद्य - - - - - - - इत्येव तदवोचम् ॥६॥
अथ यदवोचं स्वः प्रपद्ये - - - - - - तदवोचं तदवोचम् ॥७॥

A) या विराट अविनाशी कोशाचे ध्यान करून हा मंत्र म्हणायचा.
मी प्राणांना म्हणजेच भूतसमुदायाला म्हणजेच निर्माण झालेल्या सर्व विश्वाला शरण आलो आहे.
B) मी 'भू' ला म्हणजे पृथ्वी, अंतरिक्ष व द्युलोक या त्रैलोक्याला शरण,
C) मी 'भुव' ला म्हणजे अग्नि, वायु व आदित्याला शरण आलो आहे.
D) मी 'स्व' ला म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदाला शरण आलो आहे.

©www.madhaveeraghuveer.com

JUNE 2013

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

वैशाख शु. १० संवत २०६९
सोमवार २०/५/२०१३

MAY
20
MONDAY

षोडशः खण्डः ।

या खंडामध्ये सबंध मानवीजीवन हाच एक यज्ञ आहे अशी कल्पना असून पहिली चोवीस वर्षे हा एक भाग - प्रातःसवन, त्यानंतरची चव्वेचाळीस वर्षे हा माध्यंदिन सवन आणि त्यानंतरच्या ४८ वर्षांचा काळ हा परिपक्व अवस्थेचा तृतीय सवनाचा आहे.

त्रिसुपर्णात म्हटल्याप्रमाणे जीवन हाच यज्ञ व्हायचा असेल तर या जीवनयज्ञातील प्रत्येक आहुति ही 'इदं न मम' या भावनेने घायला हवी. माझे जीवन ही परमेश्वराची आराधना असून केवळ इंद्रियांना खूश ठेवणे हे माझे उद्दिष्ट असायला नको. म्हणूनच या यज्ञाला आत्मयज्ञोपासना म्हटले आहे.

पुरुषो वाव यज्ञस्तस्य यानि चतुर्विंशतिवर्षाणि तत्प्रातःसवनं चतुर्विंशत्यक्षरा गायत्री गायत्रं प्रातःसवनं तदस्य वसवो अन्वायत्ताः प्राणा वाव वसव एते हि इदं सर्वं वासयन्ति ॥१॥

यज्ञ हा दिवसाच्या तीन विभागात, तसेच आयुष्यही तीन विभागात विभागलेले असते.

खरोखर पुरुषाचे जीवन हाच एक यज्ञ आहे.

पहिली २४ वर्षे - प्रातःसवन - गायत्री छंद - वसुगण अनुगत. प्राण हेच खरोखर वसु आहेत. प्राणांशिवाय जीवन शक्य नाही.

तं चेत् एतस्मिन् वयसि किञ्चिद् उपतपेत् स ब्रूयात् प्राणा वसव इदं मे प्रातःसवनं माध्यन्दिनं सवनम् अनुसंतनुतेति इति मा अहं प्राणानां वसूनां मध्ये यज्ञो विलोप्सीयेति । इति उद्धैव ततः एति अगदः ह भवति ॥२॥

पायातील जोडवी, विरवल्यामुळे अकाल मृत्यु टळतो.
कामभावनेवर नियंत्रण येते.

MVAT for April
ESI Payment

या सवनात रुद्रगण अनुगत असतात.

जर या प्रातःसवनरूपी आयुष्यात - पहिल्या २४ वर्षात काही रोग, व्याधींमुळे कष्ट होत असतील तर त्याने प्राणरूपी वसुगणांना अशी प्रार्थना करावी की तुम्ही माझ्या या प्रातःसवनाला माध्यंदिन सवनाशी जोडून एकरूप करून टाका. मी यज्ञ स्वरूप आहे. तुम्हा प्राणरूपी वसुंच्या उपासनेमध्ये मी विलुप्त होऊन जाऊ नये.

या प्रार्थनेमुळे तो विघ्न, व्याधींपासून मुक्त होऊन निरोगी होतो. आयुष्य पहिल्या चोवीस वर्षातच नष्ट होऊ नये.

अथ यानि चतुश्चत्वारिंशद् ------ एते हि इदं सर्वं रोदयन्ति ॥
तं चेत् एतस्मिन् वयसि ------ तत एति अगदः ह भवति ॥

हा कालखंड ४४ वर्षांचा म्हणजे २५ पासून ६८ वर्षांपर्यंतचा माध्यंदिन सवनाचा आहे. या काळात काही त्रास, व्याधि उद्भवल्या तर प्राणांना, रुद्रांना प्रार्थना करून हे माध्यंदिन सवन तृतीय सवनाशी एकरूप होऊ द्यावे. अशा प्रार्थनेने हे माध्यंदिन सवन अपुरे राहत नाही. अशी प्रार्थना केल्यावर कष्ट निघून जातात. तो त्रासरहित होतो, तापरहित होतो. व्याधिमुक्त होऊन आरोग्यसंपन्न होतो.

अथ यानि अष्टाचत्वारिंशत -------- एते हि इदं सर्वमाददते
तं चेत एतस्मिन् वयसि -------- तत एति अगदो ह एव भवति

यानंतरची ४८ वर्षे तृतीयसवनाची आहेत. ६८ ते ११६ वर्षे. या सवनाचे अनुगत 'आदित्य गण' आहेत. प्राण हेच आदित्य आहेत. ते आदित्यच या संपूर्ण विषयसमूहांचे ग्रहण करतात. या सवनामध्ये जर काही व्याधि, त्रास असेल

© www.madhuraveeraghuveer.com

तर त्या उपासकाने आदित्यगणांना प्रार्थना करून विनवावे की या माझ्या तृतीय सवनाला आयुष्याशी एकरूप करून टाका. माझे हे तृतीय सवन अपूर्ण राहू देऊ नकोस. माझे प्राण मध्येच नष्ट होऊ नयेत मला पूर्ण आयुष्य प्राप्त होऊ देत. अशा प्रार्थनेने व्याधिग्रस्त होऊन तो दुःखापासून मुक्त होतो व त्याला आरोग्य प्राप्त होते.

एतद् ह स्म वै तद् विद्वान् आह ---- जीवति य एवं वेद॥ ॥१६॥

जीवनयज्ञाबद्दलची ही प्रसिद्ध विद्या जाणणारा ऐतरेय महीदास म्हणाला होता की अरे रोगा, तू मला का त्रास देतोस? मी काही या रोगाने मरणार नाही.
पुढे तो ११६ वर्षे जगला.

एका ब्राह्मणाने ठेवलेल्या बाईच्या इतरेचा मुलगा! त्याला इतर मुलांप्रमाणे आपल्या वडिलांच्या मांडीवर बसून मंत्रोच्चारण शिकण्याची इच्छा झाली. परंतु तो अनौरस असल्याने समाज स्वीकारत नसल्याने वडिलांनी नकार दिला. तेव्हा तो आईकडे तक्रार घेऊन गेला. आईने त्याची समजूत घातली व त्यानंतर आईच्या मार्गदर्शनाने त्याने महीची (पृथ्वीची) उपासना केली.
∴ तो महीदास म्हणून ओळखला जातो.

त्याच्यावरूनच एका उपनिषदाला ऐतरेय उपनिषद म्हटले जाते. त्यातील 'प्रज्ञानं ब्रह्म' हे तर ऋग्वेदाचे महावाक्य म्हणून ओळखले जाते. एवढा सन्मान त्याला ज्ञानाने मिळाला.

अशा प्रकारे जीवनाला यज्ञ समजून प्राण, वसू, रुद्र, आदित्य यांची प्रार्थना केल्याने पूर्ण आयुष्य जगता येते.
११६ वर्षे

© www.madhaviveeraghuveer.com

सप्तदश: खण्ड:।

स यद् आशिशिषति यत्पिपासति यन्न रमते ता अस्य दीक्षा: ॥१॥

तो पुरुष जो खाण्याची इच्छा करतो, जो पिण्याची इच्छा करतो, जो रममाण होत नाही. हीच जणू या यज्ञासाठी घेतलेली दीक्षा आहे. —— वरदानंद

X —— याउलट

जो उपवास करतो, पाणी पीत नाही, विषय भोगत नाही तेव्हा त्या दीक्षा समजाव्या. —— के. वि. बेलसरे.

अथ यद् अश्नाति यद् पिबति यद् रमते तद् उपसदै एति ॥२॥

तो जे खातो, पितो, विषयानंद घेतो ते सर्व पयोव्रत घेण्यासारखे आहे उपसद आहे.

3 अथ यद् हसति यज्जक्षति यद् मैथुनं चरति स्तुतशस्त्रैरेव तदेति
4 अथ यत्तपो दानमार्जवमहिंसा सत्यवचनम् इति ता अस्य दक्षिणा:
5 तस्माद् आहु: सोष्यति असोष्ट इति पुनरुत्पादनम् एव अस्य तद् मरणम् एव अवभृथ: ॥५॥

तसेच तो जे हसतो, खातो, स्त्रीसहवासाचे सुख अनुभवतो हे सर्व स्तुतशस्त्राप्रमाणे शब्दयुक्त (गद्य मंत्रांना शस्त्र) आहे.

तसेच जे तप, दान, आर्जव, अहिंसा आणि सत्यवचन ही या य यज्ञाची दक्षिणा आहे.

म्हणूनच म्हटले आहे की प्रसूत होईल (सोष्यति) किंवा प्रसूत झाली हा त्याचा पुनर्जन्मच आहे. मरण म्हणजे या यज्ञाचे अवभृथ स्नान आहे. (यज्ञ समारोप) शेवटचे स्नान

©www.madhaveeraghuveer.com

तद् ह एतत् घोर आङ्गिरसः कृष्णाय देवकीपुत्राय उक्त्वा उवाच अपिपासः एव सः बभूव सः अन्तवेलायाम् एतत् त्रयं प्रतिपद्येत, अक्षितम् असि, अच्युतम् असि, प्राणसंशितम् असि। तद् एते द्वे ऋचौ भवतः॥ ६॥

आंगिरस नावाच्या घोर नावाच्या ऋषींनी या यज्ञदर्शन विद्येचा देवकीपुत्र कृष्णाला उपदेश केला. तो ऐकून कृष्ण अपिपासः म्हणजे तृष्णारहित झाला. अर्थात त्याला अन्य विद्या शिकण्याची इच्छा राहिली नाही, अशी ही यज्ञदर्शन विद्या अतिशय महान आहे.

घोर अंगिरसांनी कृष्णाला ही यज्ञविद्या सांगून म्हटले अंतकाळी अक्षितमसि, अच्युतमसि, प्राणसंशितमसि या तीन मंत्रांचा जप करावा. (तू अक्षित, अति सूक्ष्म प्राण आहेस.) हे ज्ञान जाणणाऱ्या त्या घोराला दुसऱ्या कोणत्याही ज्ञानाची इच्छा राहिली नाही. याविषयी पुढील २ मंत्र आहेत.

आदित्प्रत्नस्य रेतसः। उद्वयं तमसस्परि ज्योतिः पश्यन्त उत्तरंस्वः पश्यन्त उत्तरं देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तममिति ज्योतिरुत्तममिति

ते जे दोन मंत्र आहेत ते असे आहेत - आदित्प्रत्नस्य रेतसः। व उद्वयं तमसस्परि।

पहिला मंत्र —— आदित्प्रत्नस्य रेतसो ज्योतिः पश्यन्ति वासरम्। परो यदिध्यते दिवि।

अर्थ - जगाचे जे कारण, पुरातन कारण जे ब्रह्म आहे त्याचा प्रकाश आम्ही पाहतो आहोत. हा प्रकाश सर्वत्र व्याप्त आहे. हा प्रकाश म्हणजे परब्रह्माचे देदीप्यमान तेज आहे.

© www.madhavaraghuveer.com

MAY
25
SATURDAY

वैशाख पौर्णिमा संवत २०६९
शनिवार २५/५/२०१३

बुद्धपौर्णिमा

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

दुसरा मंत्र - उद्वयं तमसस्परि।

अर्थ - अज्ञानरूप अंधकाराच्या पलीकडे उत्कृष्ट ज्योतिला पहात, आत्म्याच्या उत्कृष्ट ज्योतिला पहात आम्ही संपूर्ण देवांमध्ये प्रकाशित सर्वोत्तम ज्योतिस्वरूप सूर्याशी एकरूप होत आहोत.

आत्म्याचे तेज व ते तेज एकरूप असल्याचा अनुभव हे मंत्र जपत असताना साधकाला येतो.

यज्ञस्वरूप हे जीवन होता। करेल गीता गाता गाता।

प्रत्यक्षातील यज्ञ हा प्रतीकस्वरूप असतो. वस्तुतः जीवनयज्ञाची ती लहानशी प्रतिकृति असते. याची जाणीव उपनिषदकालीन ऋषींना होती. भगवद्गीतेत तर १२ प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत ते देखील प्रतीकरूपच आहेत.

मीपणाचा त्याग किंवा शरणागति हे यज्ञाचे मर्म आहे, उपासनापास ही यज्ञदीक्षा तर विषयोपभोग हे यज्ञमंत्र सात्विक गुण या आहुति तर प्रजोत्पादन हे उत्पादन मृत्यु हे अवभृथ स्नान। संबंध मानवीजीवन हाच यज्ञ.

त्रिसुपर्ण स्तोत्र— विद्वानाचा आत्मा हा यजमान

SUNDAY, MAY 26 वैशाख कृ. १/२ संवत २०६९

श्रद्धा ही यजमानपत्नी शरीर हे समिधा, छाती हे यज्ञकुंड त्यावरील केस हे दर्भ, शिखा(शेंडी) हे वेद. हृदय हे यूप कामना हे आज्य(तूप) कामक्रोध-विकार - बळीचे पशू तप हाच अग्नि, दमन - शमयिता, इंद्रियसंयम - पुरोहितांची दक्षिणा

वाक्(वाणी) - होता (ऋग्वेद)
प्राण - उद्गाता (सामवेद)
चक्षु - अध्वर्यु (यजुर्वेद)
मन - ब्रह्मा (अथर्ववेद)

} ही भावना सतत जागती ठेवण्यासाठी रोज जेवणापूर्वी त्रिसुपर्ण म्हटले जाई.

© www.madhaveeraghiveer.com

जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत या यज्ञाची दीक्षा समजावी.
जे खातो ते सर्व हविर्द्रव्य
जे पितो ते सोमपान
ज्यात रमतो मी उपसद यष्टि.
यजमानाचे उठणे, बसणे, हिंडणे - प्रवर्ग
त्याचे मुख हाच आहवनीय अग्नि
ज्याचे उच्चारण करतो (व्याहृति) त्याच आहुति
जेवतो त्या समिधा
सकाळ दुपार, संध्याकाळ - प्रातःसवन, माध्यंदिन, तृतीय सवन
अहोरात्र - दशपूर्ण इष्टि इ० यज्ञ
मरण - अवभृथ स्नान

याचा अर्थ इतकाच की प्रपंचात आपोआप मिळालेले सुखभोग भोगून, त्याचप्रमाणे तप, दान, अहिंसा इ० गुणांचा अभ्यास करून साधना केली असता अंतकाळी शाश्वत ब्रह्मज्योतिचे दर्शन घडते.

© www.madhaveeraghuveer.com

पान - ९३९
पान - ५०८

MAY
28
TUESDAY

वैशाख कृ. ४ संवत २०६९
मंगळवार २८/५/२०१३

अंगारक संकष्ट चतुर्थी

APRIL 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30				

अष्टादश: खण्ड:

'मनो ब्रह्म' इति उपासीत । इति अध्यात्मम् । अथ अधिदैवतम् । 'आकाश: ब्रह्म' इति । उभयम् आदिष्टं भवति । अध्यात्मं च अधिदैवतम् च ।

'मन ब्रह्म आहे' अशा भावनेने उपासना करावी. ही अध्यात्मदृष्टीने म्हणजे शरीर व शरीरान्तर्गत अवयवांना ब्रह्म समजून केलेली उपासना आहे. मन हे आत्मिक साधन (अंत:करण - उपकरण) आहे.

'आकाश हे ब्रह्म' अशी भावना ठेवून उपासना करणे म्हणजे अधिदैविक उपासना आहे. शरीराबाहेरील देवाला ब्रह्म समजून उपासना करणे ही अधिदैविक उपासना आहे.

मन एवढे एवढे जसा खसखशीचा दाणा ।
मन केवढे केवढे त्यात आभाळ मायना ॥

मन आणि आकाश दोन्ही सूक्ष्म आहेत. मनानेच ब्रह्मापर्यंत पोहोचता येते. ब्रह्म आकाशाप्रमाणे सर्वगत, सूक्ष्म उपाधिरहित आहे.

तद् एतद् चतुष्पाद् ब्रह्म । वाक् पाद: प्राण: पाद: चक्षु: पाद: श्रोत्र पाद: इति अध्यात्मम् । अथ अधिदैवतम् । अग्नि: पाद: वायु: पाद: आदित्य: पाद: दिश: पाद: । इति उभयम् एव आदिष्टं भवति अध्यात्मं च एव अधिदैवतं च ॥

ब्रह्माला चार चरण आहेत अशी कल्पना करावी.

मनसंज्ञक ब्रह्म	आकाशब्रह्म
वाणी	अग्नि
प्राण	वायु
चक्षु	आदित्य
श्रोत्र	दिश ॥

© www.madhaveeraghuveer.com

वागेव ब्रह्मणश्चतुर्थ पादः । स अग्निना ज्योतिषा भाति च तपति च । भाति च तपति च कीर्त्या यशसा ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥३॥

वाणि हा मनब्रह्माचा पाद असून त्याचा संबंध आकाशब्रह्मातील अग्निशी आहे. वाणीरुपी पाद अग्निरुपी ज्योतिने प्रदीप्त होतो व तापतो. अशा प्रकारे उपासना करणारा यश, कीर्ति व ब्रह्मवर्चस्वाने (तेजाने) प्रकाशित होतो, तप्त होतो, तेजस्वी होतो, त्याची सर्वत्र प्रशंसा केली जाते.

प्राण एव ब्रह्मणश्चतुर्थः पादः । स वायुना ज्योतिषा भाति च तपति च । भाति च तपति च कीर्त्या यशसा --- य एवं वेद ॥४॥

प्राण हा वायुरुप ज्योतिने प्रकाशित होतो. जो हे जाणून उपासना करतो त्याला यश, कीर्ति, ब्रह्मतेज प्राप्त होते.

चक्षुरेव --- आदित्येन --- ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥५॥
श्रोत्रमेव --- दिग्भिर्ज्योतिषा --- ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥६॥

डोळे हा ब्रह्माचा पाद आदित्याच्या प्रकाशाने प्रकाशित व तप्त होतो व हे जाणून उपासना करणाऱ्याला यश, कीर्ति, ब्रह्मतेज प्राप्त होते. श्रोत्र हा ब्रह्माचा पाद दिशारुप ज्योतिने प्रकाशित व तप्त होतो. व हे जाणून उपासना करणारा यश, कीर्ति ब्रह्मतेज प्राप्त करतो

© www.madhaveeraghuveer.com

वैशाख कृ. ६ संवत २०६९
गुरुवार ३०/५/२०१३

मानवी मनाची संकल्पशक्ती अगाध व प्रचंड असते. जगामध्ये दिसणारी सर्व सुधारणा म्हणजे मानवी मनाच्या शक्तीचाच परिणाम आहे. सर्व संशोधक, वैज्ञानिक यांनी लावलेल्या शोधांच्या मागे ही मनाची प्रेरणाच आहे.

जेम्स वॅट - वाफेच्या इंजिनाचा शोध
ग्रॅहम बेल - टेलिफोनचा शोध.

हीच मनाची प्रेरणा योग्य दिशेला वळवता आली तर अविश्वसनीय बदल व सुधारणा घडू शकतात. परंतु सामान्य मनुष्य ही शक्ती काळजी, तळमळ करण्यातच खर्च करतो किंवा बाह्य परिस्थिती बदलायला जातो. ते शक्य होत नाही. दुसऱ्याला बदलण्यापेक्षा स्वतःला बदलणे शक्य आहे.

मनाला विवेकाने आणि प्रेमाने वळवून भगवंताकडे लावले तर आत्मज्ञान होणे कठीण नाही. सामान्यतः मन सारखे बाहेर धावल्याने त्याची शक्ती क्षीण होते. सगळ्यात जास्त बोलणे, खाणे-पिणे, पहाणे आणि ऐकणे यामध्ये अधिक शक्ती खर्च होते. या ठिकाणी सावध राहून मित्रत्वाने मनाला वश केले तर जीवनात फारसे कष्ट न करता सहज सुलभ रीतीने भगवंताची उपासना करणे शक्य होते.

एकोनविंशः खण्डः

आदित्यो ब्रह्म इति आदेशः। तस्य उपव्याख्यानम्। असत् एव इदम् अग्रे आसीत्। तद् सत् आसीत् तत् समभवत् तत् अण्डं निरवर्तत। सत संवत्सरस्य मात्राम् अशयत। तत निरभिद्यत ते आण्डकपाले रजतं च सुवर्णं च अभवताम्॥१॥

आदित्य ब्रह्म आहे असा श्रुतींचा आदेश आहे. त्यासंबंधी हे सांगितले आहे. प्रथम सुरुवातीला हे जगत अव्यक्त (असत्) होते. नंतर ते व्यक्त होऊ लागले. हे सत् अंकुरित झाले व एका अंड्यामध्ये परिवर्तित झाले. एक वर्षपर्यंत ते अंडे तसेच पडून होते. पुढे ते फुटले व त्यातून एक चांदीचे व एक सोन्याचे अशी त्याची दोन शकले झाली.

तद् यद् रजतं सेयं पृथिवी यत् सुवर्णं सा द्यौः यद् जरायु ते पर्वताः यद् उल्बं स मेघो नीहारो या धमनयः ता नद्यः यद् वास्तेयं उदकं स समुद्रः॥२॥

या अंड्यातील जो चांदीचा भाग त्याची पृथ्वी, सुवर्णाचा भाग तो स्वर्ग. जरायु म्हणजे स्थूल वार होती (वेष्टन होते) त्याचे पर्वत झाले. उल्ब म्हणजे सूक्ष्मवेष्टन ते मेघ झाले, धुके झाले. त्याच्या शिरा होत्या त्या नद्या झाल्या आणि त्याच्या मूत्राशयातील पाण्याचा समुद्र झाला.

© www.madhavaraghuveer.com

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तद् त्वं पूषन अपावृणु सत्यधर्माय दृष्टये ।

JULY 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30	31			

वैशाख कृ. ८ संवत २०६९
शनिवार १/६/२०१३

JUNE 1 SATURDAY

~~तद् यद् अण्डं सा इयं पृथिवी~~ [illegible]
अथ यद् तद् अजायत सः असौ आदित्यः तं जायमानं घोषा: उलूलवो अनुदतिष्ठन् सर्वाणि च भूतानि सर्वे च कामाः तस्माद् तस्योदयं प्रति प्रत्यायनं प्रति घोषा उलूलवो अनुतिष्ठन्ति सर्वाणि भूतानि च सर्वे च कामाः ॥३॥

नंतर त्यापासून जे उत्पन्न झाले तो आदित्य होय. तो उत्पन्न होत असताना मोठे आनंददायक आवाज झाले. त्या आवाजाबरोबरच सर्व भूते, भोग आणि वासना निर्माण झाल्या. आणि म्हणूनच आदित्याच्या उदयाचे वेळी मोठे आनंददायक आवाज निर्माण होतात त्यामुळेच सर्व भूतमात्र व काम जागृत होतात.
सर्व निर्मितीसाठी सूर्याची उब आवश्यकच आहे. त्याशिवाय अन्नाखेरीज बी रुजत नाही. कडधान्याला मोड येत नाही. दुधाचे दही

स य एतमेवं विद्वान् आदित्यं ब्रह्मेति उपास्ते अभ्याशो ह यद् एनं साधवो घोषा आ च गच्छेयुः उप च निम्रेडेरन् ॥

SUNDAY, JUNE 2 वैशाख कृ. ९ संवत २०६९

जो हे सर्व रहस्य जाणून आदित्याची उपासना करतो तो स्वतः आदित्यरूप होतो. सुंदर घोष त्याच्याजवळ येऊन त्याला सुख देतात.
छांदोग्य या खंडात सृष्टीनिर्मितीची कल्पना मांडली आहे. ग्रीस देशातील ऑर्फिक धर्मात अशीच अंड्याच्या टरकलांची कल्पना आहे. थोडक्यात सर्व सृष्टी ही दृश्य-अदृश्य, व्यक्त-अव्यक्त यांचे मिश्रण असून व्यक्तापेक्षा अव्यक्त अधिक श्रेष्ठ आहे. सूर्य हा सर्वच प्राण्यांचा प्राणाधार असून अत्यंत आनंददायक आहे. मात्र अव्यक्त हे सूर्याच्या पलीकडे असल्याने आदित्याची उपासना केल्यास अव्यक्त ब्रह्माकडे पोहोचता येते असे म्हणता येईल.

With Best Compliments from
प्रॉपर्टी तुमची...
शेखर वास्तुनिर्मिती
▸ गुंठेवारी ▸ सरकारी मोजणी ▸ प्लॅन मंजुरी
▸ एन. ए. ऑर्डर ▸ प्रॉपर्टी कन्सल्टंट ▸ बिल्डिंग कन्स्ट्रक्शन्स

अन्नमय कोश — प्राणमय — मनोमय — विज्ञानमय - आनंदमय

१७ डिसेंबर २०१९

JUNE
3
MONDAY

वैशाख कृ. १० संवत २०६९
सोमवार ३/६/२०१३

MAY 2013						
S	M	T	W	T	F	S
			1	2	3	4
5	6	7	8	9	10	11
12	13	14	15	16	17	18
19	20	21	22	23	24	25
26	27	28	29	30	31	

(१७ खंड)

- अध्याय चवथा -

यात १७ खंड असून ३/४ कथा आहेत. पण यात प्रामुख्याने वायु आणि प्राण यांची उपासना सांगितली आहे. साधकाच्या दृष्टीने प्राणमय कोश शुद्ध असणे महत्वाचे असते. प्राण म्हणजे अंतःकरणातील वृत्तींना बळ देणारी गति देणारी शक्ति होय.

जोपर्यंत प्राणमय कोश शुद्ध होत नाही तोपर्यंत कामक्रोधादि विकार तसेच देहबुध्दीला धरून असणाऱ्या प्रापंचिक वासना साधकाच्या अंतर्यामी गोंधळ घालत असतात. त्यासाठी या दोन उपासना महत्वाच्या आहेत.

१. ब्रह्माचीच शक्ति असलेला ब्रह्मांडातील **वायु**
२. पिंडामध्ये त्या वायुचेच रूप असलेला **प्राण**

या दोघांना उपासनेने वश करून घेण्याचा मार्ग आपल्याला ऋषी दाखवतात.

व्यवहारात आपण पाहतो की श्रीराम उपासने बरोबरच वायुपुत्र हनुमानाची उपासना केली जाते. हनुमान ही रामाची शक्ति (कीलक) आहे. किंबहुना केवळ हनुमंताला प्रसन्न करून घेतले तर तो रामदर्शन घडवून आणतो अशी कल्पना आहे. त्याचप्रमाणे आत्मारामाचे दर्शन होण्यासाठी, आत्मज्ञान होण्यासाठी पिंडामध्ये प्राणरूपाने खेळणारी शक्ति वश व्हायला हवी.

ग्रीस देशातील दोन मोठे तत्वचिंतक
ॲनाक्सीमिनिस व डायोजेनिस
हे वायुलाच देव किंवा सृष्टीचे मूलतत्व मानत असत.

एकूण १७ खंड

पहिले ३ खंड — ज्ञानश्रुति व रैक्व यांची कथा
पुढील ६ खंड सत्यकाम जाबाल कथा
शेवटचे ८ खंड उपकोशल कथा

© www.madhavwearaguruvee.com

रैक्व - कथा

जनश्रुतीचा मुलगा / वंशज जानश्रुति

हा मोठा दानशूर राजा होता. पौत्रायण म्हणजे नातु! या जानश्रुतिला दान करण्यात मोठा आनंद मिळत असे. शिवाय तो थोडेथोडके, नावापुरते देत नसे. तर तो 'बहुदायी' म्हणजे भरपूर देणारा, श्रध्देने देणारा होता.

त्याला अन्नदान करण्याची विशेष आवड होती. त्यामुळे तो भरपूर अन्न शिजवी (बहुपाक्य) व लोकांना तृप्त होईपर्यंत खाऊ घाली. त्याच्या राज्यातील लोक तर या दानाने तृप्त होतच असत. परंतु इतर राज्यातील सर्व लोकांना देखील जेवायला मिळावे, यासाठी त्याने सर्व दिशांना धर्मशाळा बांधल्या. त्या सर्वांच्या राहण्याची, उतरण्याची, जेवण्याची व्यवस्था केली असा हा राजा सदाचरणी होता. दानशूर होता. लोक त्याला दुवा देत. त्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती.

ॐ जानश्रुतिः ह पौत्रायणः श्रद्धादेयो बहुदायी बहुपाक्य आस । स ह सर्वतः आवसथान् (धर्मशाळा) मापयाञ्चक्रे सर्वतः एव मे अत्स्यन्ति इति ॥१॥

अथ ह हंसा निशायाम् अतिपेतुः (उडून पुढे गेले) तद् ह एवं हंसं हंसः अभ्युवद — हो हो अयि भल्लाक्ष (मंददृष्टी) (हंसाचे नाव) जानश्रुतेः पौत्रायणस्य समं दिवा ज्योतिः आततं तत् मा प्रसाङ्क्षीः तत् त्वा मा प्रधाक्षीः इति ॥२॥

उन्हाळ्याच्या दिवसात राजा शांत तृप्त मनाने सौधावर ~~झोपला~~ निजला असताना त्याच्या नजरेसमोरून दोन हंस उडत गेले. त्यापैकी एक हंस दुसऱ्या हंसाला म्हणाला -

©www.madhaveeraghuveer.com

इति+ह+आस — इतिहास.

"अरे भल्लाक्षा, असा विचार न करता इथून जाऊ नकोस. तुला माहिती नाही का? आकाशात पौत्रायण जानश्रुतीच्या कीर्तीचे तेज स्वर्गापर्यंत पसरले आहे. ते दिवसासारखे लख्ख आहे. त्या तेजाला स्पर्श केलास तर तू त्यात होरपळून जाशील!"

जानश्रुतीच्या कानावर हा संवाद पडला. तो स्तुति ऐकून प्रसन्न झाला. आणखी कान टवकारून ऐकू लागला.

तमु ह पर: प्रत्युवाच कं वरएनम् एतत् सन्तं सयुग्वानम् इव रैक्वम् आत्थ? इति। पर: हंस: उवाच। य: नु कथं सयुग्वा रैक्व? इति ॥३॥

तो पुढे उडणारा दुसरा हंस (भल्लाक्ष) म्हणाला, अरे, तू कुणाबद्दल एवढे चांगले बोलतो आहेस? हा जो जानश्रुती तो काही गाड्यावाली राहणाऱ्या रैक्वाइतका श्रेष्ठ आहे का? तेव्हा पहिला हंस म्हणाला. हा गाड्यावाला रैक्व म्हणजे कोण?

यथा कृताय विजिताय अधरेया: संयन्ति एवम् एनम् सर्वं तद् अभिसमेति यत् किंच प्रजा: साधु कुर्वन्ति य: तद् वेद यत् स: वेद स मया एतत् उक्त: इति ॥४॥

पटाच्या खेळात फासे व सोंगट्या असतात. फासे टाकल्यावर दान पडते त्याप्रमाणे सोंगट्या पुढे सरकवल्या जातात. चार प्रकारची (कृत, त्रेता, द्वापार व कलि) अशी दाने आहेत. कलीचे दान एक, द्वापारची दोन, त्रेताची तीन तर कृताची चार दाने असतात. परंतु कृताचे दान पडल्यावर कृताचे चार व त्याबरोबरच कलि, द्वापार, त्रेता युगाची अशी दहा दाने

© www.madhaveeraghuveer.com

मिळून ६+४=१० चे दान मिळते.

कृताय: विजित: येन स: कृतायविजेता।

एकदा कृताचे दान जिंकले की खालची सर्व दाने प्राप्त होतात. त्याचप्रमाणे जो ब्रह्माला जाणतो तो ब्रह्मच होतो म्हणजे त्याच्या खालचे सर्व काही त्याला मिळाल्यासारखेच असते. सर्व प्रजेने म्हणजेच इतर सर्व लोक जे काही सत्कृत्य करतात ते सर्व याच्या खात्यात जमा होते. थोडक्यात तो विश्वभर पसरलेला असतो.

असा ब्रह्माला जाणणारा खरा ज्ञाता-जाणकार असा रैक्व आहे. त्याच्या धर्मफळात सर्वांचे धर्मफळ सामावले जाते. तो मोडक्या छकड्याखाली राहतो म्हणून त्याला 'सयुग्वा गाड्यावाला' म्हणतात.

आता मला तू सांग की त्या रैक्वाएवढा तुझा तो जानश्रुति महान आहे का?

खरं म्हटलं तर जानश्रुति श्रेष्ठ, सदाचरणी, दानशूर होता पण ब्रह्मवेत्ता किंवा ब्रह्मजिज्ञासुही नव्हता. रैक्व जे जाणतो ते जाणणारा आणखी कुणी असेल तर त्याला रैक्वाप्रमाणे फळ मिळेल. जानश्रुति तसा नव्हता. त्यामुळे मल्लाक्षाला त्याच्यापासून होरपळण्याची भीति नव्हती.

तदु ह जानश्रुति: पौत्रायण उपशुश्राव। स ह संजिहान एव क्षत्तारम् उवाच। अङ्ग अरे ह सयुग्वानम् इव रैक्वम् आत्थ इति। य: कथं सयुग्वा रैक्व? इति। यथा कृताय विजिताय अधरेया: संयन्ति एवम् एनं सर्वं तदभिसमेति यत् किंच प्रजा: साधु कुर्वन्ति य: तद् वेद यत् स वेद स मया एतत् उक्त: इति।।५।।

© www.madhaveeraghuveer.com

३८ डिसेंबर २०१८

S	M	T	W	T	F	S
			1	2	3	4
5	6	7	8	9	10	11
12	13	14	15	16	17	18
19	20	21	22	23	24	25
26	27	28	29	30	31	

जानश्रुतिने हे सर्व लक्ष देऊन ऐकले. त्याला स्वतःची स्तुति ऐकण्याचीच सवय झाली होती. आज कुणीतरी त्या गाड्याखाली राहणाऱ्या रैक्वाची स्तुति करत होते, आणि राजाला तुच्छ समजत होता. हे ऐकून त्याची झोप उडाली. राजा बेचैन झाला. तो रात्रभर रैक्वाचाच विचार करत होता. नेहमीच्या प्रथेप्रमाणे पहाटे जेव्हा भाट चारण राजाची स्तुति करु लागले. त्याला जागे करु लागले तेव्हा राजाने आपल्या शय्येचा त्याग केला व आपल्या सारथ्याला बोलावून म्हणाला, "अरे सारथ्या, तू माझी अशी स्तुति करतो आहेस की जणू काही मी रैक्व आहे.

त्या सारथ्याने हे नाव कधीच ऐकले नव्हते. त्यामुळे तो गोंधळून गेला व त्याने विचारले, "कोण हा रैक्व?" तेव्हा राजाने रैक्वाबद्दल वर्णन करुन सांगितले — ज्याप्रमाणे कृतफासा पडला की त्याच्या खालची सर्व दाने आपोआप मिळतात त्याप्रमाणे या जगात सर्वजण जी काही सत्कर्मे करतात त्यांच्या सर्वांचे पुण्य या रैक्वाला मिळते. त्याच्या सारखा ज्ञानी तोच खरा ज्ञानी!

हंसाकडून जे ऐकले होते तेच राजा सांगत होता. त्याला वाटले की माझ्या कामाच्या व्यापात कदाचित मी हे नाव ऐकले नसेल परंतु रैक्व जर इतका ज्ञानी, इतका प्रसिद्ध असेल तर सारथी त्याला जाणत असेल. त्याच्याकडून रैक्वाबद्दल आणखी काही माहिती मिळेल.

त्याच वेळी सारथ्याने ओळखले की राजाला रैक्वाला भेटण्याची उत्सुकता आहे म्हणून त्याने रैक्वाला शोधून काढण्याचे ठरवले व तो त्यासाठी बाहेर पडला.

© www.madhaveedadhave.com

स ह क्षत्तान्विष्य न अविदम् इति प्रत्येयाय तं ह उवाच अरे यत्र ब्राह्मणस्य तद् एनम् ऋच्छ इति॥७॥

सारथ्याने शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ। रैक्व काही सापडला नाही, निराश होऊन तो परत आला. (प्रत्येय) व आपली असमर्थता प्रगट केली.

त्यावर राजाने विचार केला, हा जर खरोखर ब्रह्मज्ञानी असेल तर शहरात सापडणे कठीण आहे कुठे रानात, नदीकाठी, मठात, वनात कदाचित सापडेल. राजा सारथ्याला म्हणाला — अरे, जिथे ब्रह्माचा शोध घेणारे ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मण जिथे राहतात, तिथे जाऊन तू रैक्वाचा शोध घे.

रैक्वाचा शोध लागत नाही म्हटल्यावर राजाची उत्सुकता आणखी वाढली.

सः अधस्तात् शकटस्य पामानं कषमाणम् उप उपविवेश तं ह अभ्युवाद त्वं नु भगवः सयुग्वा रैक्व इति। अहं हि अरा ऽऽऽ इति ह प्रतिजज्ञे। स ह क्षत्ता अविदम् इति प्रत्येयाय॥८॥

पुन्हा एकदा सारथी शोधार्थ निघाला. नगराबाहेर तो रैक्वाचा शोध घेऊ लागला. गावापासून दूर, कोणीतरी सोडून दिलेला मोडका छकडा त्याला दिसला, त्याच्या खाली उघड्यावरच, एक माणूस खरूज खाजवत बसलेला दिसला.

सारथ्याने तिथे रथ थांबवून, उतरून त्या माणसाजवळ बसून विचारू लागला. आपणच जो रैक्व का?

हो रे बाबा! मीच तो रैक्व।

सारथ्याला आनंद झाला, तो माणूस सापडला. आनंदाने

© www.madhaveeraghuveer.com

सारथी राजाकडे गेला व उत्साहाने राजाला रैक्वाविषयी सगळं सांगितले. — मोडका छकडा, खरुज खाजवणे इ.

खरोखर ब्रह्मज्ञान होण्यासाठी माणूस श्रीमंत प्रतिष्ठित, प्रसिद्ध, देखणा असला पाहिजे अशी काही अट नसते. उलट तो नसलेलाच बरा! त्याने खूप ग्रंथांचा अभ्यास केलेला असावा, अशीही काही अट नसते. केवळ मनाने ब्रह्माशी एकरूप होणे इतकेच अभिप्रेत आहे.

चोखा मेळा, जनाबाई, कान्होपात्रा, संत सखू यांनी तर कशाचाही अभ्यास केला नव्हता. ही सर्व संतमंडळी आपल्या भक्तिभावाच्या सामर्थ्यावर ब्रह्मज्ञानी झाली. इथेदेखील भिकाऱ्यासारखा राहणारा, खरजेने भरलेला असून सुद्धा ब्रह्मसाक्षात्कारी असा रैक्व आदरणीय वाटतो.

द्वितीयः खण्डः

तदु ह जानश्रुतिः पौत्रायणः षट्शतानि गवां निष्कम् अश्वतरीरथं तदादाय प्रतिचक्रमे तं ह अभ्युवाद ॥१॥

रैक्वाचा शोध लागल्यामुळे जानश्रुति आनंदित झाला. आता रैक्वाकडून ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होईल या विचाराने त्याने रैक्वाकडे जाण्याची तयारी केली. शेवटी राजाच तो! राजाने तर कुणाकडून काही फुकट घ्यायचेच नसते. आणि शिवाय दक्षिणा दिल्याशिवाय गुरुकडूनही ज्ञान घेऊ नये. असा सर्व विचार करून जानश्रुतिने आपल्या बरोबर सहाशे धष्टपुष्ट गायी घेतल्या. गळ्यात घालायला सोन्याचा कंठा घेतला शिवाय खेचरांनी ओढला जाणारा रथ घेतला. हे पाहून रैक्व खूश होईल व आपल्याला ब्रह्मविद्या देईल असा राजाला विश्वास होता. सारथी राजाला गावाबाहेर असलेल्या रैक्वाकडे घेऊन गेला.

© www.madhaveeagnihotri.com

रैक्व इमानि षट्शतानि गवाम् अयं निष्कः, अयम् अश्वतरीरथः (हे) नु भगवः एतां यां देवताम् उपास्से देवतां मे अनुशाधि।

हे रैक्व, या सहाशे गायी, हा गळ्यात घालायचा हार, खेचरींनी ओढला जाणारा रथ (तुझ्यासाठी आणला आहे.) या गायींवर तुझा निर्वाह व्यवस्थित होईल. येण्या जाण्यासाठी तुला हा रथ होईल. तू प्रसन्न होऊन ज्या देवतेची उपासना तू करतोस, त्याचा मला उपदेश कर. मी शिष्यभावाने तुझ्याकडे आलो आहे.

तमु ह परः प्रत्युवाचाह हारे त्वा शूद्र तवैव सह गोभिः सह हारेत्वा (रथः) तव एव अस्तु। इति। तदु ह पुनरेव जानश्रुतिः पौत्रायणः सहस्रं गवां निष्कम् अश्वतरीरथं दुहितरं तद् आदाय प्रतिचक्रमे ।।३।।

त्या राजाला तो पर (दुसरा म्हणजे रैक्व) उत्तरादाखल असे म्हणाला, "अरे हे शूद्रा, हा तुझा हार, तुझ्या गायी व रथांसह घेऊन निघून जा." रैक्वाला या संपत्तीचे आकर्षण नव्हते. तो परब्रह्माशी एकरूप झाला होता. तेव्हा राजाला प्रश्न पडला की कशाने हा प्रसन्न होईल? त्याने त्याच्या खरजेकडे पाहून विचार केला की कदाचित हा त्या खरजेच्या त्रासातून मुक्त झाला तर हा प्रसन्न होईल. अशा विचाराने राजा परत आपल्या नगरीत गेला आणि येताना पुन्हा १००० गायी, गळ्यातील हार, खेचरीचा रथ व आपली कन्या अर्पण करण्यासाठी घेऊन आला. ही माझी मुलगी त्याची सेवा करेल व त्यामुळे तो प्रसन्न होईल असे राजाला वाटले.

© www.manaveeraghaveer.com

तं ह अभ्युवाद रैक्व इदं सहस्रं गवा, अयं निष्कः अयम् अश्वतरीरथ इयं जाया अयं ग्रामः यस्मिन् आस्से भगवः मा अनुशाधि एव इति। तस्या ह मुखम् उपोद्गृह्णन् उवाच- आजहार इमाः शूद्र अनेन एव मुखेन आलापयिष्यथाः इति। ते हि एते रैक्वपर्णा नाम महावृषेषु यत्र अस्मा उवास स तस्मै ह उवाच॥४॥५॥

राजा सर्व गोष्टी बरोबर घेऊन (पुन्हा) रैक्व होता तिथे पोहोचला. व त्याने रैक्वाला विनंति केली, "हे रैक्व, या हजार गायी, हा सोन्याचा हार, खेचरींने ओढला जाणारा हा रथ, ही माझी कन्या, तुम्ही जिथे राहत आहात ते हे गाव। या सर्व गोष्टी स्वीकारा व मला ज्ञानाचा उपदेश करा.

विद्या स्वीकारण्याची सहा स्थाने आहेत.

१. विद्याध्ययनाचे व्रत घेतलेला ब्रह्मचारी
२. पैसे (गुरुदक्षिणा) देऊन विद्या घेणारा
३. अत्यंत बुद्धिमान - विद्या ग्रहण करण्यास सुयोग्य.
४. वेदाध्ययन केलेला / करणारा
५. आपल्याला प्रिय असणारा
६. विद्येच्या बदल्यात विद्या घेणारा.

अशा प्रकारे राजाने आपली कन्या रैक्वाला पत्नी म्हणून अर्पण केली. तिने त्याची उत्तम सेवा केली. औषधी तेल / वनस्पती वापरून त्यांची खाज शमवली. त्याला आराम वाटेल असे केले. त्यामुळे रैक्व प्रसन्न झाला. व राजाच्या इतर भेटीदेखील स्वीकारून त्याला विद्या देण्याची तयारी दाखवली.

©www.madhaveeraghuveer.com

२६ डिसेंबर २०१९

(खग्रास सूर्यग्रहण)

तृतीयः खण्डः।

वायुर्वाव संवर्गो यदा वा अग्निरुद्वायति वायुमेवाप्येति यदा सूर्योऽस्तमेति वायुमेवाप्येति यदा चन्द्रोऽस्तमेति वायुमेवाप्येति ॥ १ ॥

रैक्वाने जानश्रुती पौत्रायणाला संवर्ग विद्या शिकवली. संवर्ग म्हणजे ज्यात सर्व सामावले आहे. तिथूनच सर्व बाहेर पडते व त्यातच सर्व विलीन होते.

इतर उपनिषदांमध्ये हीच कल्पना आकाशाला संवर्ग मानून मांडली आहे. परंतु आकाश दिसत नाही. जाणवत नाही म्हणून छांदोग्य उपनिषद वायुपासून (मातरिश्वा) सुरुवात करते. वायुलाच सर्वांचे मूळ मानते. छांदोग्यांच्या मताप्रमाणे वायुपासूनच तेज — आप — पृथ्वी निर्माण झाली. वायु हा जगताचा प्राण आहे. वायुमुळेच विश्वाची व शरीराची हालचाल होते.

रैक्वाने सांगितले - वायुच हा खरा संवर्ग आहे. अग्नि शांत होऊन वायुतच विलीन होतो. सूर्य अस्ताला जातो तेव्हा वायुतच विलीन होतो. चंद्रदेखील अस्तानंतर वायुलाच प्राप्त होतो.

तेजाची उत्पत्ति वायूतूनच होते. ज्वलनशील वायुपासून अग्नि निर्माण होतो. सूर्य देखील अशाच ज्वलनशील वायूचा गोळा आहे. ऑक्सिजन हा वायुचाच भाग आहे. जशी मातीची वस्तू फुटल्यानंतर मातीत विलीन होते. अलंकार वितळल्यावर सोनेच उरते. तसेच सर्व कार्य हे कारणात विलीन होते. त्यामुळे सर्वच गोष्टी अंती वायुला प्राप्त होतात. वायुच मुख्य आहे. त्याला जाणले की सर्व जाणल्यासारखेच आहे.

संवर्जन - आत्मसात करणे, संग्रहण - साठा करणे
संग्रसन - गिळंकृत करणे — हे सर्व करणारा वायु आहे.

With Best Compliments From

Tel.: 020-24268043.

यदाप उच्छुष्यन्ति वायुमेवापियन्ति वायु र्हि एव एतान् सर्वान् संवृक्ते इति अधिदैवतम् ॥२॥

जेव्हा पाणी सुकते, तेव्हा ते वायुमध्येच विलीन होते. (तळ्यातले पाणी सुकल्यावर वायुमध्ये विलीन होते, ओल्या कपड्यातील पाणी वायुमध्ये मिसळून जाते. या सर्वांना वायु आपल्यामध्ये विलीन करून घेतो. वायुच या सर्वांचे कारण आहे आणि इतर सर्व गोष्टी म्हणजे वायुचे कार्य (Finished Product) आहे. समाप्तिनंतर ते सर्व पुन्हा कारणामध्ये (Raw Material) विलीन होते.

या अधिदैवत सृष्टीमध्ये आप व अग्नि वायुमध्येच विलीन होतात. एका वायुदेवतेची उपासना केली तर इतर सर्व देवतांची उपासना केल्याप्रमाणेच आहे.

अथाध्यात्मं प्राणो वाव संवर्गः स यदा स्वपिति प्राणमेव वागप्येति प्राणं चक्षुः प्राणं श्रोत्रं प्राणं मनः प्राणो हि एव एतान् सर्वान् संवृङ्क्ते इति ॥३॥

वरील मंत्रात अधिदैविक दृष्टीने या विश्वातील वायुचा विचार केला आता आध्यात्मिक दृष्टीने विचार केला तरी प्राणच खरोखर संवर्ग आहे.

जेव्हा मनुष्य झोपतो तेव्हा (स्वपिति) स्वतःमध्ये सर्वांचा लय होतो. अर्थात त्या वेळी वाणी प्राणांमध्ये लय पावते, दृष्टी - बघण्याची शक्ती प्राणांमध्ये लय पावते, श्रोत्र - ऐकण्याची शक्ती, मन (संकल्पविकल्पात्मक) लय पावते ∴ प्राण हाच या सर्वांचा संवर्ग आहे.

माणूस निजतो तेव्हा सर्व सूक्ष्म इंद्रिये मनामध्ये जातात

With Best Compliments From
Factory : Gat No. 1722 (Old 2106),

असा, केव्हा बाहेरची स्थूल इंद्रिये निजलेली असतात. परंतु सूक्ष्म इंद्रियांच्या आधारे मन स्वप्नात बोलू, पाहू, पळू, खाऊ शकते. सर्व क्रिया करू शकते. परंतु गाढ झोपेत (सुषुप्ति अवस्थेत) मन हे सूक्ष्म इंद्रियांसह प्राणात विलीन झाले असल्यामुळे सर्वच — (स्थूल इंद्रिये, सूक्ष्म इंद्रिये, मन) प्राणांमध्ये विलीन होतात. यास झोपतात. व जाग आल्यावर पुन्हा प्राणामधून मन — सूक्ष्म इंद्रिये, स्थूल इंद्रिये बाहेर पडतात. व दैनंदिन व्यवहार सुरू होतात.

★ हे सर्व नैसर्गिकरीत्या सहजतेने, सौम्यतेने घडायला हवे. घाईघाईने, जबरदस्तीने जर या प्रक्रियेमध्ये अडथळा आणला गेला तर मन, सूक्ष्म इंद्रिये घोटाळ्यात पडतात. व त्याचे गंभीर परिणाम देखील होऊ शकतात. ∴ शक्यतो गजर कर्कशपणे लावू नये. पक्ष्यांच्या किलबिलाटाने, भूपाळीने, मंद सुमधुर संगीताच्या आवाजाने जाग आली तर दिवसाची सुरुवात चांगली होते. कोणालाही मोठ्या आवाजात ओरडून उठवू नये. हळुवारपणे, अलगदपणे जाग यावी.

चल उठ रे मुकुंदा झाली पहाट झाली।
बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली॥

घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठी लवकरी वनमाळी उदयाचली मित्र आला।

तौ वा एतौ द्वौ संवर्गौ वायुरेव देवेषु प्राणः प्राणेषु ॥४॥

(आधिदैविक)
देवांमध्ये वायु व इंद्रियांमध्ये (अध्यात्म) प्राण हा मुख्य संवर्ग आहे.

JUNE 17 MONDAY	ज्येष्ठ शु. ८ संवत २०६९ सोमवार १७/६/२०१३	MAY 2013

अथ ह शौनकं च कापेयमभिप्रतारिणं च काक्षसेनिं परिविष्यमाणौ ब्रह्मचारी बिभिक्षे तस्मा उ ह न ददतुः ॥५॥

एकदा कपिगोत्राचा शौनक व कक्षसेनिचा पुत्र अभिप्रतारी भोजनाला बसले असताना एका ब्रह्मचाऱ्याने भिक्षा मागितली. त्या दोघांनी (वाढप सुरु असतानाही) त्याला भिक्षा घातली नाही. ब्रह्मचाऱ्याचा निर्वाह हा गृहस्थावर अवलंबून असतो. त्या गृहस्थधर्माशी प्रतारणा केली. शिवाय आपण जेवत असताना कुणीही अभ्यागत अतिथी आला तरी भुकेल्याला अन्न द्यायलाच हवे. अशा वेळी कुणीही रिक्त हाताने जाता कामा नये.

स ह उवाच महात्मनः चतुरो देव एकः कः स जगार भुवनस्य गोपास्तं कापेय नाभिपश्यन्ति मर्त्या अभिप्रतारिन् बहुधा वसन्तं यस्मै वा एतदन्नं तस्मा एतन्न दत्तमिति ॥६॥

तो (ब्रह्मचारी) म्हणाला — त्या एका प्रजापतिने (वायुने) चार देवांना ग्रस्त केले आहे. (अग्नि, आप, पृथ्वी, सूर्य, चंद्र) तोच वायु / प्राण सर्व (वाक्, दृक्, श्रवण इ.) शक्तींना गिळत करतो. तोच प्राण सर्व लोकांचे (१४ भुवनांचे) रक्षण करतो. भिन्न भिन्न शरीरातून राहणाऱ्या या वायु व प्राणासाठी अन्न असते. तुम्ही ते माझ्यातील प्राणांना दिले नाहीत.

इथे वायुलाच प्रजापति (प्रजा उत्पन्न करणारा) म्हटले आहे कारण तोच सर्वांचा निर्माता आहे. विश्वनिर्मितीत वायू व व्यक्तीत तो प्राण आहे. तोच १४ भुवनांचे रक्षण करतो. म्हणून त्याला या अन्नाचा प्रसाद द्यायला हवा. पण तुम्ही त्या प्राणांनाच अन्न दिले नाहीत. ही तुमची फार मोठी चूक आहे.

With Best Compliments From

©www.madhaveeradhuree.com

तदु ह शौनकः कापेयः प्रतिमन्वानः प्रत्येयायात्मा देवानां जनिता प्रजानां हिरण्य दंष्ट्रो बभसः अनसूरिः महालम् अस्य महिमानं आहुः अनद्यमानो यत अनन्नम् अत्ति इति वै हे ब्रह्मचारिन् इदं वयम् उपास्महे। अस्मै भिक्षां दत्त

ब्रह्मचाऱ्याचे हे बोलणे ऐकल्यावर कापेय शौनकाने त्यावर विचार केला. मग त्याच्या जवळ जाऊन (प्रत्येयाय) त्याला म्हणाला, "देवांचा आत्मा असणारा (वायु- जो सर्वांचा निर्माता आहे) हिरण्यदंष्ट्र (भक्कम दाढांचा) या सर्व देवतांना (इंद्रियांना) गिळंकृत करताना, त्यात त्याला कसलीही अडचण येत नाही. तो नितका सक्षम आहे. भक्षणशील आहे. त्यामुळच तो सर्वांना स्वतःमध्ये विलीन करुन घेतो. असा तो अत्यंत बुद्धिमान आहे. त्याचा महिमा खूप मोठा आहे. तो स्वतः कुणाकडून खाल्ला जात नाही. असा स्वतः मात्र जे अन्न नाही (अनन्न आहे) त्यालाही खाणारा (देव/इंद्रिये हे काही अन्न नाही, पण त्यांनाही तो खातो) असा जो हा (वायु) देव आहे. त्याची आम्ही उपासना करतो.

मात्र तू जे सांगत होतास की 'या वायुला कोणीही मर्त्य योनीतील कोणीही जाणू शकत नाही' हे विधान खरे नाही. आम्ही त्याला जाणतो. असे बोलून शौनकाने ब्रह्मचाऱ्याकडे पुन्हा नीट पाहिले. हा साधासुधा भिक्षेकरी नसून तो जाणकार ब्रह्मचारी आहे, अर्थात भिक्षा देण्यास योग्य आहे हे जाणून शौनकाने सेवकांना आज्ञा करुन त्याला भिक्षा देवविली. ही भिक्षा सत्पात्री होती. ब्रह्मचारी वायुबद्दल सर्वांबद्दल जाणत होता. त्याला त्याचे ज्ञान होते. अर्थात शौनकालादेखील त्याबद्दल माहिती होतीच.

तस्मा उ ह ददुस्ते वा एते पञ्चान्ये पञ्चान्ये दश सन्तस्तत्कृतं तस्मात्सर्वासु दिक्षु अन्नमेव दश कृतं सैषा विराडन्नादि तयेदं सर्वं इष्टं सर्वमस्येदं इष्टं भवति अन्नादो भवति य एवं वेद य एवं वेद॥८॥

मग त्यांनी त्याला भिक्षा दिली.
आता आधिदैविक वायु व आध्यात्मिक प्राणाविषयी
हे चार वेगळे व ते पाच वेगळे
(आधिदैविक) (आध्यात्मिक)
दोन्ही मिळून कृत होतात. द्यूतामध्ये चार प्रकारची दाने पडतात. त्यांना युगांची नावे दिली आहेत.
कलीचे दान एक, द्वापार-दोन, त्रेता-तीन व कृत-चार. पण कृताचे वैशिष्ट्य असे की त्याला स्वतःचे दान तर मिळे व त्याचबरोबर तीनही इतर दाने मिळतात. म्हणून कृत म्हणजे सर्वसमावेशक म्हणजे संवर्गाप्रमाणे आहे.
कृताचे एकत्रित दान दहा आहे. म्हणजेच दहा दिशांमधून असणारे सर्व काही यात समाविष्ट आहे. ते कृतच आहे.
ती विराट शक्तीच सर्वांना आपल्यामध्ये सामावून घेते. थोडक्यात त्या विराट शक्तीच्या माध्यमातून हे (इदम्) म्हणून जे काही दाखवता येण्याजोगे आहे ते सर्व दृश्य जगत दिसत असते त्यामुळे या शक्तीला जो जाणतो त्याने सर्व काही जाणल्याप्रमाणे आहे. तोच खरा जाणणारा. तोच अन्नाद होतो.
या ब्रह्मांडात कुणीही काहीही केले तरी त्यामागे ती विराट शक्तीच आहे. तिनेच ते केल्याप्रमाणे असते. रैक्वाला सर्व सत्कृत्याचे पुण्य मिळत होते. तसेच ब्रह्मचाऱ्याला दिलेले अन्न त्या शक्तीलाच पोहोचते.

चतुर्थः खण्डः ।

सत्यकामो ह जाबालो जबालां मातरम् आमन्त्रयाञ्चक्रे ब्रह्मचर्यं भवति विवत्स्यामि किं गोत्रो नु अहम् अस्मि इति॥

जबाला ह्या सेवा करणाऱ्या स्त्रीचा मुलगा 'सत्यकाम' एकदा आपल्या आईला हाक मारून म्हणाला, हे माते, मला ब्रह्मचर्य स्वीकारून गुरुकुलामध्ये ज्ञान संपादन करण्याची इच्छा आहे. तेव्हा तिथे गोत्रावर मला विचारणा केली जाईल. (गोत्राविषयी) तर तू मला माझे गोत्र सांग.

जबाला ही मोलकरीण / दासी असूनदेखील तिच्या मुलाला विद्याप्राप्तिची तळमळ आहे. व गुरुगृही राहून शिकण्याची ओढ आहे, तळमळ आहे.

सत्यकाम आजूबाजूच्या लोकांनाही अनेक प्रश्न विचारतो. आकाशाचा रंग निळा का? ग्रह, ताऱ्यांची निर्मिती कधी झाली? समुद्राचे पाणी खारट का?

सा ह एनम् उवाच न अहम् एतद् वेद तात यद् गोत्रः त्वम् असि बहु अहं चरन्ती परिचारिणी यौवने त्वाम् अलभे। सा अहम् एतद् न वेद यद् गोत्रः त्वम् असि। अहं तु जबाला नामा अस्मि त्वं सत्यकामः नाम असि स जाबालः सत्यकाम एव ब्रुवीथाः इति॥२॥

ती जबाला त्याला (सत्यकामाला) म्हणाली बाळा तू कोणत्या गोत्राचा आहेस हे मला माहिती नाही. मी इकडे तिकडे हिंडून खूप लोकांची सेवा करणारी परिचारिणी आहे. माझ्या तारुण्यामध्ये मी तुला जन्म दिला. त्यामुळे तुझे नेमके गोत्र कोणते ते मला माहित नाही. पण माझे नाव जबाला म्हणून तू तुझी ओळख सत्यकाम जाबाल अशी करून दे.

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From
RAJ RAJENDRA
Contact Details
Tally CCTV

स: ह हारिद्रुमतं गौतममेत्योवाच ब्रह्मचर्यं भगवति वत्स्याम्युपेयां भगवन्तमिति ॥३॥

आईने असे सांगितल्यावर सत्यकाम तेथून निघाला आणि गौतम गोत्रातील हरितद्रुमांच्या पुत्राकडे आला. आणि म्हणाला. मी भगवंतांच्या (आपल्या) जवळ राहण्याच्या उद्देशाने येथे आलो आहे. शिष्यभावाने ब्रह्मचर्य व्रत घेऊन विद्याध्ययन करण्याचा माझा हेतू आहे.

तं ह उवाच किं गोत्रो नु सोम्य असि? इति स ह उवाच न अहम् एतद् वेद भो यद् गोत्र अहम् अस्मि। अहं मातरम् अपृच्छम्। सा मा प्रत्यब्रवीत् अहं बहु चरन्ती परिचारिणी यौवने त्वाम् अलभे। स: अहम् एतद् न वेद यद् गोत्र त्वम् असि। जबाला अहं तु नामा अस्मि। सत्यकाम: त्वम् नाम असि। स: अहं सत्यकाम जाबाल: अस्मि भो: इति।

या मुलाचे हे धाडस, खरेपणा गुरुला आवडला.

© www.madhaveeraghuveer.com

JULY 2013

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30	31			

ज्येष्ठ शु. १४ संवत २०६९
शनिवार २२/६/२०१३

JUNE
22
SATURDAY

हरिद्रुमन म्हणाले, जो ब्राह्मण नसेल तो असे सत्य बोलू शकणार नाही. कारण ब्राह्मणच सत्यवादी व निर्भय असतो. सोम्य, जा समिधा घेऊन ये. मी तुझी मुंज करीन. तेव्हाच तू विद्येला पात्र होशील. तू सत्यापासून ढळला नाहीस. कोणत्याही कारणाने खोटे बोलला नाहीस.

मग हरिद्रुमाने त्याचा उपनयन संस्कार करून (स्वाध्याय, गुरुसेवा, अग्निसेवा, गोसेवा देवसेवा यांचे नियम सांगितले. हे झाल्यानंतर त्यांनी त्याला चारशे हडकुळ्या, अशक्त गाई देऊन त्यांची सेवा करायला सांगितले. तो देखील गुरुंची आज्ञा प्रमाण मानून गवताळ कुरणांच्या दिशेने निघाला व जाताना म्हणाला. या ४०० गाईंच्या १००० गायी होईपर्यंत मी येणार नाही. मग तो गाईंना घेऊन अनेक वर्षे अरण्यात राहिला. सर्व नियमांचे पालन अत्यंत प्रामाणिकपणे करून गाईचे दूध, कंदमुळे फळे खाऊन, निसर्गाच्या सान्निध्यात चिंतन करत राहिला. त्यात तो इतका रमून गेला की एक सहस्र गाई कधी झाल्या ते त्याला कळले देखील नाही.

SUNDAY, JUNE 23 पञ्चमः खण्डः वटपौर्णिमा ज्येष्ठ पौर्णिमा संवत २०६९

अथ हैनम् वृषभो अभ्युवाद सत्यकाम ३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव प्राप्ताः सोम्य सहस्रं स्मः प्रापय न आचार्यकुलम् ॥ १॥

सत्यकामाची दिनचर्या व्यवस्थित सुरु होती. १००० गायी हेच त्याचे सर्वस्व होते. तो त्यांची देखभाल करत होता. त्याच जोडीला स्नान, संध्या, हवन हे सुरु होते. निसर्गाशी तो समरस झाला होता.

With Best Compliments From

© www.madhaveeraghuveer.com

२३ जानेवारी २०२०

४.१२

अथ ह एनम् (उपकोसलं) अन्वाहार्यपचन: (दक्षिणाग्नि:) अनुशशास - आप: दिश: नक्षत्राणि चन्द्रमा: इतीय एष: चन्द्रमसि पुरुष: दृश्यते स: अहम् अस्मि स: एव अहमस्मि ||

मग त्या उपकोसलाला दक्षिणाग्निने उपदेश केला आप (जल), दिशा, नक्षत्र, चंद्र हे चार माझे शरीर आहेत. या चंद्रामध्ये जो पुरुष दिसतो तो मी (दक्षिणाग्नि) आहे.

परब्रह्माचे तेजाच्या रुपाने प्रगटीकरण होताना प्रथम बीज निर्माण झाले. पण तो प्रकाश स्थिर नव्हता. म्हणून मग स्थिर प्रकाशाच्या (Constant) शांत, शीतल चंद्राची निर्मिती झाली. परंतु निर्मितीसाठी उब हवी असल्याने दाहक तेजाच्या सूर्य निर्माण झाला. जल, दिशा, चंद्र, नक्षत्रे हे एकाच तत्त्वाचे भिन्न भिन्न आविष्कार आहेत.

स य एतमेवं विद्वान् उपास्ते स: पापकृत्याम् अपहते स: लोकी भवति सर्वम् आयु: एति ज्योग् जीवति न अस्य अवरपुरुषा: क्षीयन्ते वयं तं उपभुञ्जाम: अस्मिन् लोके च अमुष्मिन् लोके (च) य: विद्वान् एतम् एनम् उपास्ते |

जो अन्वाहार्यपचन (दक्षिणाग्नि) ची उपासना सर्व समजून करतो, त्याची सर्व पापकृत्ये नष्ट होतात. मृत्युनंतर तो चंद्रलोकाला प्राप्त होतो. त्याला संपूर्ण आयुष्य प्राप्त होते. (अपमृत्यु येत नाही.) उज्वल आयुष्य मिळते. त्याच्या वंशातील पुरुष क्षय पावत नाहीत. वंश नष्ट होत नाही. दक्षिणाग्नीची उपासना फलदायी आहे.

JULY
4
THURSDAY

ज्येष्ठ कृ. १२ संवत २०६९
गुरुवारं ४/७/२०१३

Service Tax payment
April-June

JUNE 2013

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

त्रयोदश: खण्ड:।

अथ ह एनम् आहवनीय: अनुशशास। प्राण: आकाश: द्यौ: आकाश: विद्युत इति। एष विद्युति पुरुष: दृश्यते स: अहम् अस्मि।

आहवनीय अग्निने उपकोसलाला उपदेश केला.
प्राण आकाश, द्यौ: (स्वर्ग) व विद्युत हे चार माझे देह त्या वीजेमध्ये जो पुरुष दिसतो तो मीच आहे.
प्राण — चैतन्य
आकाश - सूक्ष्मत्व, व्यापकत्व
द्युलोक - सद्‌गुण, तेजाचे प्रतीक
वीज - परब्रह्माचे शक्तिशाली तेजस्वरूप.

स य एतमेवं विद्वानुपास्ते अपहते .... भिवानुपाले

© www.madhavgeraghuveer.com

चतुर्दशी: 2095:

8
9
10
11
12
1
2
3
4
5
6
7
8

© www.madhaveeraghuveer.com

JULY
6
SATURDAY

ज्येष्ठ कृ. १३ संवत २०६९
शनिवार ६/७/२०१३

TDS payment of June

JUNE 2013

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

पञ्चदशः खण्डः

य एषः अक्षिणि पुरुषः दृश्यते एष आत्मेति ह उवाच — एतद् अमृतम् अभयम् एतद् ब्रह्म इति तद् यद्यपि अस्मिन् सर्पिः वा उदकं वा सिञ्चति वर्त्मनि एव गच्छति ॥

डोळ्यात दिसणारा पुरुष हा माणसाचा आत्मा असतो. हा पुरुष ब्रह्मचर्य आदि साधना करणाऱ्या विवेकी पुरुषांना दिसतो. तोच अमृत आहे, अभय आहे, ब्रह्म आहे.

डोळ्यात जेव्हा तूप / वा पाणी घातले जाते तेव्हा ते पापण्यातून (वर्त्मनी) वाहून जाते. तसाच आत्मा निर्लिप्त आहे.

अभय हा दैवी गुणसमुच्चयाच्या अग्रस्थानी आहे. द्वितीयात् वै भयं भवति। सगळीकडे एकमेवाद्वितीय ब्रह्माची अनुभूति झाली की भय उरतच नाही. असा तो कशानेही लिप्त होत नाही. भेद सरणे हीच ज्ञानाची प्राप्ति आहे.

एतं संयद्वाम इति आचक्षते एतं हि सर्वाणि वामानि अभिसंयन्ति । यः एवं वेद एनं सर्वाणि वामानि अभिसंयन्ति ।
य एवं वेद एनं सर्वाणि वामानि अभिसंयन्ति ॥

SUNDAY, JULY 7 ज्येष्ठ कृ. १४ संवत २०६९

वामानि – प्रशंसनीय वस्तू, सेवनीय.
अभिसंयन्ति – जवळ जातात, प्राप्त होतात.

या डोळ्यात दिसणाऱ्या पुरुषाला संयद्वाम म्हणतात. सर्व चांगल्या गोष्टी याच्याकडेच येतात. ज्याला हे रहस्य उमजते त्याच्याकडे आपोआपच सर्व चांगल्या गोष्टी येतात.

एष उ एव भामनीरेष हि सर्वेषु लोकेषु भाति सर्वेषु लोकेषु भाति यः एवं वेद ॥

© www.madhaveeraghuveer.com

हाच भामनी आहे. म्हणजे आदित्य, चंद्र, अग्नी इ. रूपांनी हाच प्रदीप्त होतो. हा तेजाचे वहन करतो. हाच सर्व लोकांमधून तळपत असतो, दीप्त असतो. जो हे रहस्य जाणतो तो दीप्त होतो, तेजस्वी होतो.

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति॥

अथ यदु चैवास्मिन् शव्यं कुर्वन्ति यदि च न अर्चिषम् एव अभिसम्भवन्ति। अर्चिषः अहरह्ं आपूर्यमाणपक्षम् आपूर्यमाणपक्षात् यान् षडुदङ्ङेति। यान् मासान् तान् मासान् मासेभ्यः संवत्सरं संवत्सरात् आदित्यम् आदित्यात् चन्द्रमसं चन्द्रमसः विद्युतं तत्पुरुषः अमानवः सः एनान् ब्रह्म गमयति एष देवपथः ब्रह्मपथः एतेन प्रतिपद्यमानाः इमं मानवं आवर्तं नावर्तन्ते न आवर्तन्ते॥५॥

असा हा साधक - जो नेत्रात असलेल्या - संयद्वाम, वामनी, भामनी इ. गुणांनी युक्त सुखाकाशाची उपासना करतो प्राणसहित अग्निविद्येची उपासना करतो. त्याला मृत्युनंतर उत्तम गति मिळते. (अंत्यसंस्कार कुणी करो न करो.)

आचार्य आता उत्तम गति सांगतात - अर्चिराभिमानी देवतेकडून या साधकाचा स्वीकार होतो, तिथून तो अहरहाभिमानी देवतेकडे, तिथून शुक्लपक्षाच्या देवतेकडे, तिथून उत्तरायणाच्या देवतेकडे, मग मासाभिमानी देवतेकडे, त्यानंतर संवत्सराभिमानी देवता - आदित्य - चंद्रमस - विद्युत देवता आणि तिथून अमानवी पुरुषाच्या बरोबर ब्रह्मापर्यंत पोहोचतो.

देवयान - देवपथ, ब्रह्मयान - ब्रह्मपथ या मार्गाने गेलेला साधक पुन्हा परतत नाही. पुनर्जन्म नाही. तो मुक्त होतो.

With Best Compliments From
Induvision
CABLE NETWORK
1436, Kasba Peth,
Pune - 411 011.
Tel. No.: 24574958

© www.madhaveeraghuveer.com

षोडश खण्डः

एष ह वै यज्ञो योऽयं पवते एष ह यन्निदं सर्वं पुनाति। यदेष यन्निदं सर्वं पुनाति तस्मादेष एव यज्ञस्तस्य मनश्च वाक्च वर्तनी ॥१॥

मार्ग (वर्तनी)

हा जो (पवन) वाहत आहे तोच यज्ञ आहे. हा जाणारा सर्व जगाला पवित्र करतो म्हणून त्याला यज्ञ म्हणायचे. मन व वाणी हे त्याचे मार्ग आहेत. वायु हा जगताचा प्राण आहे. हा वाहताना सर्व जग पवित्र करतो.

पवनः पवतामस्मि। - विभूतियोग - (गीता-१०)

श्रुतीमध्ये स्वाहा वाते धाः। म्हणजे यज्ञ वायूच्या हाती सोपवला जातो असे म्हटले आहे. वायूला यज्ञाचा आरंभक म्हटले आहे. चलनवलन क्रियेशी वायूचा प्रत्यक्ष संबंध आहे. त्याला यज्ञाची प्रतिष्ठा म्हणतात. जो गतिशील आहे त्याचीच योगनिवृत्ति होते.

थांबला तो संपला।

वाणी व मनाने यज्ञ प्रवृत्त होतो.

तयोरन्यतरां मनसा संस्करोति ब्रह्मा वाचा होता अध्वर्युरुद्गातान्यतरां (संस्करोति) स यत्र उपाकृते प्रातरनुवाके पुरा परिधानीयाया व्यवदति ॥२॥

अन्यतरामेव वर्तनीं संस्करोति हीयते अन्यतरा स यथैकपाद्व्रजन् रथो वैकेन चक्रेण वर्तमानः रिष्यति एवम् अस्य यज्ञः रिष्यति यज्ञं रिष्यन्तं यजमानः अनुरिष्यति स इष्ट्वा पापीयान् भवति ॥३॥

वाणी व मन हे त्याचे मार्ग आहेत. त्यापैकी मनावर संस्कार ~~ब्रह्मा~~ ब्रह्मा करतो तर उद्गाता व अध्वर्यु व होता वाणीवर

© www.madhaveeraghuveer.com

संस्कार करतात. प्रातः अनुवाक् शस्त्राचा आरंभ झाल्यानंतर जर ब्रह्मा मध्येच बोलला, त्याचे मौन भंग झाले तर दुसरा मार्ग (मन) बंद होतो व केवळ एकाच मार्गावर संस्कार होतो. (मन या मार्गाची हानि होते त्यामुळे यज्ञात दोष निर्माण होतो) ज्याप्रमाणे रथ एकाच चाकावर चालू शकत नाही. मनुष्य एका पायावर चालायला गेला तर पडतो त्याचप्रमाणे एकाच मार्गावर चालणारा हा यज्ञ नष्ट होतो. यज्ञ नष्ट झाल्यावर यजमान नष्ट होतो. उलट यज्ञ करून तो अधिकच पापाचा धनी होतो.

ऋग्वेदाचा — होता — (तीन सहायक) - ऋचा म्हणतो
यजुर्वेदाचा - अध्वर्यु — यज्ञाच्या क्रिया करणे व करवून घेणे
सामवेदाचा - उद्गाता - देवांना प्रसन्न करून घेतो.
अथर्ववेदाचा ब्रह्मा - मौन पाळून देखरेख ठेवतो.

यज्ञात काही कमतरता राहिली तर पहिला दोष ब्रह्म्यावर येतो. त्यामुळे ब्रह्मावर मोठी जबाबदारी असते. त्याने न बोलता सर्व कार्य व्यवस्थित करवून घ्यायचे आहे.

अथ यत्रोपाकृते प्रातरनुवाके न पुरा परिधानीयाया ब्रह्मा व्यवदत उभे एव वर्तनी संस्कुर्वन्ति न हीयतेऽन्यतरा॥ स यथा उभयपाद्व्रजन्रथो वोभाभ्यां चक्राभ्यां वर्तमानः प्रतितिष्ठति एवम् अस्य यज्ञः प्रतितिष्ठति यज्ञं प्रतितिष्ठन्तं यजमानो अनुप्रतितिष्ठति स इष्ट्वा श्रेयान् भवति॥ ५॥

आणि प्रातरनुवाकाचा प्रारंभ झाल्यापासून ब्रह्माने मौन पाळले तर दोन्ही (मन व वाणी) वर संस्कार होतात. त्यामुळे एखादा मार्ग नष्ट होण्याचा दोष लागत नाही. सारा यज्ञ सुप्रतिष्ठित होतो. त्यामुळे यजमान प्रतिष्ठित होतो, श्रेयसाची प्राप्ति होते.

With Best Compliments From
Service Tax R. No. : P-III/STC/CRC/569/06
PAN No. : AGRPC 0510 E
सुभाष भोज चव्हाण
लेबर कॉन्ट्रॅक्टर
लक्ष्मीनगर, डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०२९. फोन : ९९७०३६३१४८

यज्ञ तडीस जाण्यासाठी प्रत्येकाने आपापले कर्तव्य चोख पार पाडावे

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

सप्तदश खण्ड:

प्रजापतिर्लोकान् अभ्यतपत् । तेषां तप्यमानानां रसान् प्रावृहत् । अग्निं पृथिव्या: वायुम् अन्तरिक्षात् आदित्यं दिव: ।

[ब्रह्माचे मौन भंग झाले तर दोष परिहारासाठी व्याहृतिंची उपासना या खंडात सांगितली आहे.]

प्रजापतिने लोकांचे सार ग्रहण करण्यासाठी तप केले. त्याने पृथ्वीपासून आदित्यरूप रस ग्रहण केला.

स एतास्तिस्रो देवता अभ्यतपत्तासां तप्यमानानां रसान्प्रावृहद् अग्ने: ऋचो वायो: यजूंषि सामान्यादित्यात् ॥

मग त्याने तीन देवतांना उद्देशून तप केले. अग्नी, वायु व आदित्य। अग्निपासून- ऋक् मंत्र, वायुपासून- यजुर्मंत्र तर आदित्यापासून साम मंत्र।

स एतां त्रयीं विद्यामभ्यतपत् तस्या: तप्यमानाया: रसान् प्रावृहद् भू: इति ऋग्भ्य: भुव: इति यजुर्भ्य: स्व: इति सामभ्य: ॥३॥ तद् यदि ऋक्तो रिष्येत् भू: स्वाहा इति गार्हपत्ये जुहुयाद् । ऋचाम् एव तद् ऋचां रसेन ऋचां ऋचां वीर्येण यज्ञस्य विरिष्टं संदधाति
रि (दोष)

या त्रयी विद्येला उद्देशून त्याने तप केले. व त्यांचा रस ग्रहण केला. जर (यज्ञकाळी) ऋग्वेदाच्या संबंधात काही दोष आला तर 'भू: स्वाहा' म्हणून गार्हपत्य अग्नित आहुति द्यावी. अशाप्रकारे ऋचांच्या वीर्याद्वारे ऋक्संबंधी यज्ञाच्या दोषाची पूर्ति होईल.

© www.madhaveeraghuveer.com

अथ यदि यजुष्टो रिष्येद् 'भुवः स्वाहा' इति दक्षिणाग्नौ जुहुयाद् यजुषाम् एव तद् रसेन यजुषां वीर्येण यजुषां यज्ञस्य विरिष्टं संदधाति ॥५॥

यजुः श्रुतीमुळे दोष निर्माण झाला असेल तर 'भुवः स्वाहा' असे म्हणून दक्षिणाग्निमध्ये आहुति द्यावी. अशा प्रकारे यजूंच्या रसाने यजूंच्या वीर्याद्वारा यज्ञासंबंधी दोषांचे निवारण करता येते.

अथ यदि सामतो रिष्येद् 'स्वः स्वाहा' इति आहवनीये जुहुयात्। साम्नाम् एव तद् रसेन साम्नां वीर्येण यज्ञस्य विरिष्टम् संदधाति

तर सामश्रुतीमुळे दोष निर्माण झाला असेल तर 'स्वः स्वाहा' असे म्हणून आहवनीय अग्निमध्ये आहुति द्यावी. अशा प्रकारे सामाच्या रसाने, सामाच्या वीर्याने यज्ञात सामासंबंधी निर्माण झालेले दोष दूर करता येतात.

तद् यथा लवणेन सुवर्णं - - - - - - दारु दारु चर्मणा।
एवमेषां लोकानाम् - - - - - - ब्रह्मा भवति ॥

त्याप्रमाणे सोन्याला डाग देताना (जोडताना) टाकण वापरतात चांदी सोन्याने जोडली जाते, रजताने कथिल जोडले जाते कथिलाने शिसे, शिशाने लोखंड, लोखंडाने / चामड्याने लाकूड जोडतात त्याप्रमाणे क्षत, पावलेला (बिघडलेला) यज्ञ या तीन विद्यांच्या वीर्याने (साराने) नीट केला जातो॥ दोषरहित होतो. ब्रह्मा जाणकार असेल तर तो सुशिक्षित वैद्याप्रमाणे रोगमुक्त करतो. दोष दूर होऊन यज्ञ यथासांग पार पडतो.

© www.madhaveeraghuleer.com

With Best Compliments From
Kakkad Development

JUNE 2013						
S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

एष ह वा उदक्प्रवणो यज्ञो -------- यत्रैवंविद् ब्रह्मा

असा यज्ञच उदक्प्रवण (उत्तर मार्ग मिळवून देणारा) असतो त्यामुळे पुण्यप्रद गति मिळते. यज्ञातील ऋत्विज ब्रह्मा जर ज्ञानी असेल तर त्याची स्तुती करताना म्हटले जाते की जिथे जिथे कर्म आवृत्त होते (म्हणजेच यज्ञात दोष निर्माण होतो तिथे तिथे हा धावतो व यज्ञाचे रक्षण करतो प्रायश्चित्ताद्वारे यज्ञाला दोषमुक्त करतो. रक्षण करतो.

राम-लक्ष्मण - यज्ञाचे संरक्षण

मानवो ब्रह्मैव एक ऋत्विक्कुरू ------- नाएवंविदम् ॥

चारही ऋत्विजांची कार्ये ठरवून दिलेली असली तरी ब्रह्माचे कार्य जबाबदारीचे आहे. मौन पाळणारा, मनन करणारा हा ऋत्विक जाणकारच असायला हवा. असा ब्रह्मा यज्ञाचे, यजमानाचे, ऋत्विजांचे रक्षण करतो. त्यामुळे नेहमी ब्रह्मा जाणकारच असावा. जो जाणकार नाही अशाला ब्रह्मा म्हणून नेमू नये.

SUNDAY, JULY 14 आषाढ शु. ६ संवत २०६९

© www.madhaveeraghuveer.com

५-६

प्रथम अध्याय: ①
प्रथम: खण्ड:

यो ह वै ज्येष्ठं च श्रेष्ठं च वेद ज्येष्ठश्च ह वै श्रेष्ठश्च भवति प्राणो वाव ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च ॥१॥
यो ह वै वसिष्ठं वेद वसिष्ठो ह स्वानां भवति वाग्वाव वसिष्ठ:॥

जो माणूस ज्येष्ठ व श्रेष्ठाला जाणतो तो स्वत: ज्येष्ठ व श्रेष्ठ होतो. खरोखर प्राणच सर्व इंद्रियांमध्ये श्रेष्ठ आहेत. जो कोणी वसिष्ठाला जाणतो तो स्वत: आपल्या ज्ञाति-बांधवात वसिष्ठ बनतो. खरोखर वाणीच वसिष्ठ आहे. [वाक् वाव वसिष्ठ:] जो वाणीचा पक्का असेल तोच जिंकतो, प्रसिद्ध होतो, श्रीमंत होतो.

यो ह वै प्रतिष्ठां ---------- चक्षुर्वाव प्रतिष्ठा। श्रोत्रं वाव संपत् । मनो ह वै आयतनम्।

☆ शरीरामध्ये प्रतिष्ठा - स्थैर्य, दृढता देणारा डोळाच आहे. पाहणारा माणूसच सर्व पाहून निर्णय घेऊ शकतो.

☆ खरोखर कानच सर्व संपद आहेत. कानांनीच वेदांचे श्रवण होते. वेदांचे ज्ञान झाले की त्यानुसार कर्म घडते. कर्म केल्यावर भोग प्राप्त होतात. म्हणून भोग प्राप्त करून देणारे कान म्हणजे संपद आहे.

वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्मस्वनुष्ठीयताम्।
नवविधा भक्तीमधील श्रवणभक्ति ही पहिली।
बहुश्रुत व्यक्ती चतुर, चाणाक्ष, हजरजबाबी असते.

☆ मन हेच इंद्रियांना प्रेरित करते. इंद्रियांनी आणलेल्या गोष्टींचा साठा करते. भोगही मनच घेते. मनच आश्रय आहे.
Inward x Outword. — Godown - Manager
गीतारहस्य

३ - ५

JULY
16
TUESDAY

आषाढ शु. ८ संवत २०६९
मंगळवार १६/७/२०१३

JUNE 2013

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

अथ ह प्राणा अहं श्रेयसि व्यूदिरे अहं श्रेयान् अस्मि अहं श्रेयान् अस्मि इति ॥६॥

एकदा ही सर्व इंद्रिये (प्राणाः) 'मी श्रेष्ठ आहे' असा आपापल्या श्रेष्ठते संबंधी वाद घालू लागली.

ते ह प्राणाः प्रजापतिं पितरं एत्य ऊचुः भगवन् कः नः श्रेष्ठः इति तान् ह उवाच 'यस्मिन् वः उत्क्रान्ते शरीरं पापिष्ठतरम् इव दृश्येत स वः श्रेष्ठः इति ॥७॥

ती सर्व इंद्रिये (प्राणाः) आपला जनक प्रजापतिकडे गेली व त्यांना म्हणाली, भगवन् आमच्यात श्रेष्ठ कोण? तेव्हा प्रजापति त्यांना म्हणाले 'जो उठून गेल्यावर सर्व शरीर पापिष्ठ (दुःखी कष्टी) दिसू लागेल, तो श्रेष्ठ समजावा.
[साते सप्तमी] इंद्रियांना कधी प्राण तर कधी देवता म्हणतात.

सा ह वाक् उच्चक्राम सा संवत्सरं प्रोष्य पर्येत्य उवाच, 'कथम् मम ऋते जीवितुं अशकत' इति । यथा कला (मुका) अवदन्तः प्राणेन प्राणन्तः चक्षुषा पश्यन्तः श्रोत्रेण शृण्वन्तः मनसा ध्यायन्त एवम् इति । वाक् ह प्रविवेश ॥८॥

वाणी शरीरातून उठून गेली. एक वर्ष प्रवास करून परत आली व इंद्रियांना म्हणाली, तुम्ही माझ्याशिवाय कसे जिवंत राहू शकलात? तेव्हा इंद्रिये म्हणाली, जसा मुका माणूस न बोलता राहू शकतो तसे आम्ही राहिलो. प्राणांनी प्राणन् करत श्वास घेत, डोळ्यांनी पहात, कानांनी ऐकत, मनाने विचार करत मजेत राहिलो. वाणीला कळून चुकले की मी गेले तरी शरीर जिवंत राहू शकते. मुकाट्याने ती परत शरीरात शिरली.

With Best Compliments From

२९ जानेवारी 2020

चक्षुः ह उच्चक्राम तत् संवत्सरं प्रोष्य पर्येत्य उवाच, मत् ऋते कथं जीवितुम् अशकत? इति यथा अन्धा अपश्यन्तः प्राणेन प्राणन्तः वाचा वदन्तः श्रोत्रेण शृण्वन्तः मनसा ध्यायन्तः एवम् इति चक्षुः ह प्रविवेश ॥५।१०,११,१२॥

मग दृष्टी उडून गेली. वर्षभर डोळ्यांनी पहाण्याचे काम केले नाही. त्यानंतर परत येऊन पाहिले तर शरीर जिवंत होते. डोळ्यांनी प्राणांना इंद्रियांना विचारले, माझ्याशिवाय तुम्ही जिवंत कसे राहिलात? ते म्हणाले, जसा आंधळा न बघता जगतो, प्राणांनी श्वास घेत, वाचेने बोलतो, कानांनी ऐकतो, मनाने विचार करत जगतो. तेव्हा डोळ्याच्या लक्षात आले की माझ्याशिवाय शरीर जगू शकते. दृष्टीने पुन्हा प्रवेश केला.

याचप्रमाणे कानांची शक्ती, मनाची शक्ती वर्षभर बाहेर राहिली. तरीही शरीराचे नित्याचे व्यवहार सुरुच होते. कान नसताना बहिऱ्या माणसाप्रमाणे आणि मनाची शक्ती बाहेर गेली असता बालक किंवा मूर्ख माणसाप्रमाणे इतर सर्व गोष्टी सुरुच होत्या. शरीर मृत झाले नाही.

अथ ह प्राणः उच्चिक्रमिषन् सः यथा सुहयः पड्वीशशङ्कून् संखिदेत् एवम् इतरान् प्राणान् समखिदत् तं ह अभिसमेत्य ऊचुः भगवन् न एधि। त्वं नः श्रेष्ठः असि। मा उत्क्रमीः इति ॥१३॥

मग प्राणांनी उडून जाण्याची इच्छा केली. तेव्हा जातिवंत घोडा त्याची परीक्षा करण्यासाठी, चाबकाने मारताच त्याला बांधून ठेवण्यासाठी ज्या खिळ्यांना दोर बांधले असतात त्या खिळ्यांना उखडून पळू लागतो. तसे प्राण बाहेर पडू लागताच अन्य इंद्रिये कासावीस झाली. व त्या सर्वांनी प्राणाला विनंति केली

With Best Compliments From

वाणी - वसिष्ठ
चक्षु - प्रतिष्ठा
कान - संपद्
मन - आयतन (आधार)

भगवन् तू जाऊ नकोस. तूच आमच्यामध्ये श्रेष्ठ आहेस. तू उत्क्रमण करून जाऊ नकोस.

अथ हैनं वागुवाच यदहं वसिष्ठोऽस्मि त्वं तद् वसिष्ठः असि इति। अथ ह एनं चक्षुः उवाच, यत् अहं प्रतिष्ठा अस्मि त्वं तत् प्रतिष्ठा असि। अथ ह एनं श्रोत्र उवाच यदहं सम्पदास्मि त्वं तत्सम्पदसीत्यथ हैनं मन उवाच यदहम् आयतनमास्मि त्वं तदायतनमसि इति ॥१४॥

आता सर्वच इंद्रियांना कळून चुकले की आपल्यात जी शक्ती आहे, ज्याचा आपल्याला अभिमान आहे ती प्राणाची शक्ती आहे. हे जाणून त्यांचा गर्व दूर झाला. व त्यांनी प्राणाला सांगितले. वाणी म्हणाली मी जी वसिष्ठ म्हणून मिरवते पण खरा तूच वसिष्ठ आहेस. डोळे - प्रतिष्ठा, कान - संपद मन - आयतन (आधार) तूच आहेस.

न वै वाचो न चक्षूंषि न श्रोत्राणि न मनांसि इत्याचक्षते प्राणाः इति एव आचक्षते प्राणः हि एव एतानि सर्वाणि भवन्ति

लोकांमध्ये सर्व इंद्रियांना वाक् - चक्षु - श्रोत्र - मन इ. म्हणत नाहीत तर सर्वांना 'प्राण' असेच म्हणतात, कारण खरोखर ही इंद्रिये म्हणजे प्राणच असतात. इंद्रियातून प्राणशक्तीच काम करत असते.

©www.madhaveeraghuveer.com

५.२

द्वितीयः खण्डः (२)

स ह उवाच किं मे अन्नं भविष्यतीति यत्किञ्चिदिदमा श्वभ्य आ शकुनिभ्य इति ह ऊचुः तद् वा एतद् अनस्य अन्नम् । अनः ह नाम प्रत्यक्षं न ह वा एवंविदि किञ्चन अनन्नम् भवति ।

तेव्हा तो मुख्य प्राण म्हणाला, 'माझे अन्न काय असणार?' तेव्हा वाणी व इतर इंद्रिये म्हणाली 'या लोकात कुत्र्यापासून पक्ष्यांपासून सर्व प्राण्यांचे जे अन्न आहे ते सर्व तुझेच अन्न आहे. या लोकी प्राण्यांकडून जे जे भक्षिले जाते ते सर्व 'अन' चे म्हणजेच प्राणांचे अन्न आहे.

या जगात कुणीहि काहीहि खाल्ले तरी त्याचे भोक्तृत्व प्राणांकडे येते. हे रहस्य जाणणाऱ्याला काहीही अनन्न राहत नाही.

अन शब्द गतिवाचक आहे. कार्यानुसार त्याचे भाग पडतात. प्र+अन, अप+अन, वि+आ+अन, उद्+आ+अन, सम+अन

प्रत्येकात प्राण आहेच. त्यामुळे ज्ञानी मनुष्य हे जाणतो की मी सर्व प्राणिमात्रात भरलेला आहे आणि त्यामुळे कुणीहि काहीहि खाल्ले तरी भोक्ता प्राणच आहे. म्हणजे या जगातील जे काही आहे ते प्राणांचे अन्नच आहे.

स ह उवाच किं मे वासो ---------- अनग्नो ह भवति ।

प्राणांनी विचारले, माझे वस्त्र काय असेल? तेव्हा वाक् आदि इंद्रिये म्हणाली, जल हे तुझे वस्त्र! म्हणून तर भोजन करण्यापूर्वी आणि भोजन झाल्यानंतर पाण्याने त्याला आच्छादले जाते. (आपोशनी) जणू प्राणांना वस्त्र नेसवले जाते. तो प्राण वस्त्रयुक्त होतो तो नग्न रहात नाही.

JULY **20** SATURDAY

आषाढ शु. १२ संवत २०६९
शनिवार २०/७/२०१३

MVAT for June / April-June
ESI Payment

JUNE 2013

S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

न ह वै ... ——— प्ररोहेयुः पलाशानीति ।

सत्यकाम जाबालांनी व्याघ्रपादाच्या पुत्राला (आपल्या शिष्याला) गोश्रुतीला सांगितले की, हे जे प्राणविषयक विचार आहेत ते एखाद्या खांबाला जरी ऐकवले तरी त्याला शाखा, पाने फुटतील. (हेच जर एखाद्या माणसाने ऐकले तर त्याचे भले होईल.)

अथ यदि महत् जिगमिषेद् अमावस्यां दीक्षित्वा पौर्णिमास्यां रात्रौ सर्वौषधस्य मन्थं दधिमधुनोरुपमथ्य ज्येष्ठाय श्रेष्ठाय स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेत ॥२॥

चांगले कर्म करून देवयान मार्ग कामावा अशा प्रकारची इच्छा जर प्राणाची उपासना करणारा साधक करत असेल तर त्याने अमावस्येला दीक्षा घ्यावी व नियमपूर्वक आचरण (पवित्र) करावे. असे १५ दिवस पौर्णिमेपर्यंत करून पौर्णिमेच्या रात्री रानातील औषधी वनस्पतींची कूट करून त्याचा मंथा करून त्यावर दही व मध घालावे पुन्हा मंथन करावे त्यानंतर ज्येष्ठाय स्वाहा श्रेष्ठाय स्वाहा' असे म्हणून अग्निमध्ये

SUNDAY, JULY 21 आषाढ शु. १३/१४ संवत २०६९

आज्याचे म्हणजेच तुपाचे हवन करून अवशिष्ट हविर्द्रव्य त्या मंथ्यावर टाकावे.

वसिष्ठाय स्वाहा इति अग्नौ ——— हुत्वा मंथे संपातमवनयेत्

प्रत्येक इंद्रियाची वैशिष्ट्य पूर्वी आपण पाहिली आहेत. त्यानुसार वसिष्ठाय स्वाहा (वाणी). प्रतिष्ठायै स्वाहा (चक्षु) संपदे स्वाहा (श्रोत्र) आयतनाय स्वाहा (मन) असे म्हणून अग्नित तुपाची आहुति देऊन उरलेले तूप मंथ्यावर टाकावे

With Best Compliments From

अथ प्रतिसृप्य अञ्जलौ मन्थमाधाय जपत्यमोनामास्यमा हि ते सर्वमिदं स हि ज्येष्ठः श्रेष्ठः राजाधिपतिः स मा ज्यैष्ठ्यं श्रैष्ठ्यं राज्यमाधिपत्यं गमयतु अहम् एव इदं सर्वं असानि इति ॥

मग अग्निपासून थोडे दूर सरकून मंथ्याला ओंजळीत घेऊन 'अमो नामा असि' तू अम नावाचा प्राण आहेस. तुझ्यातच हे सर्व आहे म्हणून तू प्राणभूत मंथच ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेस राजा /अधिपति आहेस. हे मंथरूप प्राण मला ज्येष्ठत्व, श्रेष्ठत्व प्राप्त करून देवो (राज्य आधिपत्य)
प्राणांनी जगत्स्वरूप व्हावे म्हणून ही प्रार्थना आहे.

अथ खलु एतया ऋचा पच्छ आचामति । तत् सवितुः वृणीमहे इति आचामति । वयं देवस्य भोजनं इति आचामति । श्रेष्ठं सर्वधातमम् इति आचामति । तुरं भगस्य धीमहि इति सर्वं पिबति निर्णिज्य कंसं चमसं वा पश्चाद अग्नेः संविशति चर्मणि वा स्थण्डिले वा वाचंयमो अप्रसहः । सः यदि स्त्रियं पश्येत समृद्धं कर्म इति विद्यात् ।

नंतर तो साधक एकेक ऋचा म्हणत, मंत्राच्या एक एक पादाबरोबर एक एक घास खातो. तत्सवितुः वृणीमहे असे म्हणून एक घास खातो. (आहुति देतो) वयं देवस्य भोजनम् म्हणून " " " " " सर्वधातमम् ------ तुरं भगस्य धीमही " " " हे सर्व म्हणून झाल्यावर वाटी व चमचा धुवून ते सर्व पाणी पिऊन टाकतो म्हणजे त्याला चिकटलेले सर्व पोटात जाईल. त्यानंतर अग्निच्या पाठीमागे मृगचर्मावर, पवित्र भूमीवर मौनाचा स्वीकार करून शयन करतो. त्यावेळी स्वप्नात जर स्त्री दिसली पाहिजे तर त्याचे कर्म सफल झाले असे समजावे.

With Best Compliments From
A. R. Deo
Krantiro
108, 1st Floor, ABC Nirman,

©www.madhaveeraghuveer.com

तदेष श्लोको ।यदा कर्मसु काम्येषु स्त्रियं स्वप्नेषु पश्यति ।समृद्धिं तत्र जानियात तस्मिन स्वप्नदर्शने ।तस्मिन्स्वप्ननिदर्शने ।

काम्य कर्ममध्ये स्वप्नात जेव्हा स्त्री दिसते तेव्हा त्या स्वप्नदर्शनानंतर त्या कार्यात समृद्धी येते. त्या कर्माचे फळ मिळते

तृतीय खण्ड

श्वेतकेतुर्हारुणेयः पञ्चालानां समितिमेयाय । तं ह प्रवाहणो जैवलिः उवाच । कुमार त्वा पिता अनुअशिषत् इति । अनु हि भगवः इति ।

आरुणिचा मुलगा श्वेतकेतु पंचाल देशाच्या राजाने आयोजित केलेल्या विद्वत्सभेमध्ये गेला. तिथे जीवलाचा मुलगा प्रवाहण राजा बसला होता. त्याने श्वेतकेतुला विचारले "कुमारा, तुझ्या वडीलांनी तुला काही शिकवले आहे का?" "हो भगवान्, माझ्या" मला शिकवले आहे.

वेत्थ यदितोऽधि प्रजाः प्रयान्ति इति । न भगव इति । वेत्थ यथा । पुनरावर्तन्त ३ इति । न भगव इति । वेत्थ पथोर्देवयानस्य पितृयाणस्य च व्यावर्तना इति । न भगव इति ।

जर तू शिकलेला असशील तर तुला, या लोकातून वर जाणारी प्रजा (लोक) कोठे जाते हे माहिती आहे का? असे प्रवाहणाने विचारताच श्वेतकेतुने 'मला माहीत नाही' असे सांगितले. तेव्हा वर गेलेले लोक पुन्हा या लोकात कसे येतात हे विचारले तेव्हा तेही ठाऊक नसल्याचे श्वेतकेतुने सांगितले. पुढे देवयान व पितृयान मार्गाविषयी विचारले, तेही त्याला माहिती नव्हते.
ते दोन्ही मार्ग वेगळे कोठे होतात

With Best Compliments from
प्रॉपर्टी तुमची...
विद्याधर वास्तुनिर्मिती
▶ गुंठेवारी ▶ सरकारी मोजणी ▶ प्लॅन मंजुरी ▶ लेआऊट मंजुरी
▶ एन. ए. ऑर्डर ▶ प्रॉपर्टी कन्सल्टंट ▶ बिल्डिंग कन्स्ट्रक्शन्स ▶ खाजगी मोजणी

© www.madhavveeraghuveer.com

वेत्थ यथासौ लोको न सम्पूर्यते इति न भगव इति। वेत्थ यथा पञ्चम्याम् आहुतौ आपः पुरुषवचसः भवन्ति इति। नैव भगव इति ॥३॥

इतकी लोक जर मृत्युनंतर वर जातात तर मग तो लोकच्या लोक ओसंडून कसा जात नाही हे माहिती आहे का तुला? त्यावर श्वेतकेतु म्हणाला, नाही भगवन् हेही मला ठाऊक नाही. असा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर श्वेतकेतुला माहिती नव्हते. तेव्हा राजा प्रवहण म्हणाला.

अथानु किमनुशिष्टोऽवोचथा -------- त्वाशिषमिति ॥४॥

अरे, तू काहीच जाणत नसताना असे कसे म्हणतोस की मी शिक्षण घेतले आहे. जो या प्रश्नांची उत्तरे जाणत नाही, त्याला सुशिक्षित कसे म्हणता येईल. हे ऐकून श्वेतकेतुला मनस्ताप झाला व तो तडक वडीलांकडे गेला. आणि म्हणाला, मला खरे ज्ञान न देताच तुम्ही मला असे कसे सांगितलेत की तुला शिकवले आहे?

आपण प्राप्त केलेल्या विद्येच्या आधारावर श्वेतकेतुला राजा प्रवहणाकडून मान सन्मान मिळावा अशी अपेक्षा होती. पण ते न मिळता उलट अपमानित व्हावे लागले तेव्हा त्याचा सगळा राग त्याने आपल्या वडीलांवर काढला. वास्तविक वडीलांनी त्यांच्याकडील सर्व विद्या त्याला देऊन त्याला विद्यावान केले होते.

पञ्च मा राजन्यबन्धुः -------- कथं ते नावक्ष्यमिति।

राजन्यबंधुः स्वतः काही न जाणणारा, करणारा केवळ राजाच्या नातेवाईक म्हणून मिरवणारा असा।

With Best Compliments From
© www.madhaveeraghuveer.com

त्या राजन्यबंधुने मला ५ प्रश्न विचारले. पण त्यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर मला देता आले नाही असे श्वेतकेतु वडिलांना म्हणाला व त्याने ते प्रश्न सांगितले. पण आरुणिनाही त्या प्रश्नांची उत्तरे ठाऊक नव्हती. आणि जर माहिती असती तर तुला नसती का सांगितली?

स ह गौतमो राज्ञोऽर्धमेयाय तस्मै ह प्राप्ताय अर्हांचकार स ह प्रातः सभागे उदेयाय तं ह उवाच भगवन् गौतम मानुषस्य वित्तस्य वरं वृणीथा: इति । स ह उवाच हे राजन् तव एव मानुषं वित्तं कुमारस्य अन्ते यां एव वाचम् अभाषथा: ताम् एव मे ब्रूहि इति । स: कृच्छ्री (दु:खी) बभूव ।६।

तेव्हा गौतमकुलोत्पन्न आरुणी लगेच राजाजवळ (राज्ञ: अर्धम्) गेले. राजाने आलेल्या विद्वानाचे यथोचित स्वागत करुन त्यांना विश्राम करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी पुन्हा अरोचल्यावर वंदनीय आरुणि राजदरबारात गेले तेव्हा राजा प्रवहणाने त्यांना हवा तो वर मागण्यास सुचवले. परंतु आरुणि हे जिज्ञासु होते. त्यांना विद्येची तहान होती. तेव्हा ते म्हणाले, तुझे धन तुझ्याकडेच राहू दे. तू माझ्या मुलाला जे प्रश्न विचारले होतेस त्या प्रश्नांची उत्तरे तू मला सांग. हे ऐकून राजा दुःखी झाला व विचारात पडला.

कारण समाजपुरुषाचे उत्तमांग म्हणजे ब्राह्मण आहे. क्षत्रियाला दानाचा अधिकार असला तरी ब्राह्मणाला विद्यादान करण्याचा नाही आणि आता इथे तर एक विद्वान ब्राह्मण ज्ञानयाचना करतो आहे. याला 'नाही' देखील म्हणता येत नाही. कारण जी विद्या आपल्याकडे आहे, ती मागायला कुणी आला तर त्याला नाही म्हणता येत नाही. आणि राजा प्रवहणाकडे पंचाग्नि विद्या होती आणि तिच्याबद्दलच आरुणि विचारत होते. याच पेचामध्ये राजा पडला होता.

With Best Compliments From

तं ह चिरं वस इति आज्ञापयाञ्चकार तं ह उवाच हे गौतम यथा त्वं मा अवदः यथा प्राक् त्वत्तः इयं विद्या ब्राह्मणान् न गच्छति तस्मात् उ सर्वेषु लोकेषु क्षत्रस्य एव प्रशासनम् अभूत् इति। तस्मै ह उवाच ॥७॥

तेव्हा राजाने आरुणींना 'तुम्ही चिरकाळ इथे रहा' अशी आज्ञा केली. मग राजा म्हणाला, या पूर्वी ही विद्या तुमच्या आधी कोणत्याही ब्राह्मणाला दिली नव्हती. ही विद्या फक्त क्षत्रियांमध्येच उपदेशित होत गेली.

खरोखर आतापर्यंत या पंचाग्निविद्येचा प्रसार फक्त क्षत्रियांपर्यंतच झाला आहे. तेव्हा या आरुणींना ही विद्या केवळ क्षत्रियच देऊ शकेल कारण हे जाणणारा कुणी ब्राह्मण नाहीच असे. आणि त्यांना तर ते जाणून घेण्याची उत्कट इच्छा आहे. तेव्हा मीच ही विद्या त्यांना द्यावी असा विचार करून राजाने आरुणींना हे ज्ञान देण्याचे ठरवले.

© www.madhavvedagniveer.com

अभ्रम म्हणजे वाहते पाणी नव्हे. Humidity आर्द्रता.

JULY
27
SATURDAY

आषाढ कृ. ५ संवत २०६९
शनिवार २७/७/२०१३

१८.२.२०२०

JUNE 2013						
S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

चतुर्थः खण्डः (४)

द्युलोक

असौ वाव लोको गौतमाग्निस्तस्यादित्य एव समिद्रश्मयो धूमोऽहरर्चिश्चन्द्रमा अङ्गारा: नक्षत्राणि विस्फुलिङ्गा: ॥ १॥

राजाने आरुणिला सांगितलेली पंचाग्निविद्या---
जीव वाफेबरोबर वर ढगात जातो. त्या ढगातून पाऊस बनून खाली येतो. जमिनीत रुजून धान्य बनून उगवतो. ते धान्य मनुष्याने खाल्ल्यावर त्यापासून सप्तधातू बनतात. त्यातील प्रमुख म्हणजे वीर्य. त्या वीर्याचे सिंचन स्त्रीयोनीत होते तेव्हा त्यापासून नवा जीव, नवे शरीर निर्माण होते. हे सर्व पाच यज्ञाच्या रूपकाने सांगितले आहे.

यज्ञात अग्निकुंड — आहवनीय अग्नि — समिधा — धूर — ठिणग्या — रसरशीत निखारे — हे सर्व असते.

द्युलोक — आहवनीय अग्नि
आदित्य — समिधा
सूर्य किरणे — निघणारा धूर
दिवस — ज्वाला
चंद्र — निखारा
नक्षत्र — ठिणग्या

} हा अवकाशात चाललेला एक यज्ञच आहे.

SUNDAY, JULY 28 — आषाढ कृ. ६ संवत २०६९

तस्मिन् एतस्मिन् अग्नौ देवा: श्रद्धां जुह्वति तस्या आहुते: सोमो राजा सम्भवति ॥ २॥

या अशा अग्नित देव श्रद्धेची आहुति देतात. अध्यात्मदृष्टीने श्रद्धा — प्राण | अधिदैवत रूपाने आभे | देवांच्या दृष्टीने सूक्ष्म जल म्हणजे श्रद्धा | यांचे हवन केल्यावर सोम राजा प्राप्त होतो.

पर्जन्य

पञ्चम खण्ड (५)

पर्जन्यो वाव गौतमाग्निस्तस्य वायुरेव समिदभ्रं धूमो विद्युदर्चिरशनिरङ्गारा ह्रादनयो विस्फुलिङ्गाः ॥१॥
(मेघगर्जना)

पर्जन्य हा आह्वनीय आग्नि आहे. वायु ही समिधा ढग हे धूर, वीज ही ज्वाला, वज्र हे अंगार व मेघगर्जना म्हणजे ठिणग्या आहेत.

तस्मिन् एतस्मिन् अग्नौ देवाः सोमं राजानं जुह्वति तस्या आहुतेः वर्षं सम्भवति ॥२॥

त्या आग्निमध्ये देव सोमाची आहुति दिली जाते. आणि त्याचे फलस्वरूप वर्षा होते.

(६) पृथ्वी
षष्ठ खंड :---- पृथ्वी-आग्नि, संवत्सर - समिधा, आकाश - धूर, रात्र ज्वाला दिशा - निखारे अवांतर दिशा - ठिणग्या
त्या आग्नित देव पर्जन्याची आहुती देतात. त्या आहुतीतून अन्न निर्माण होते. श्रध्दारूपी जल सोम बनले. सोमाचा पर्जन्य बनला व पर्जन्यातून अन्न निर्माण झाले.

(७) पुरुष
सप्तम खंड - पुरुष हा आग्नि वाणी ही समिधा, प्राण - धूर, जिव्हा - ज्वाला, चक्षु - निखारे श्रोत्र - ठिणग्या.
अन्न खाल्ल्यावर पुरुषाच्या शरीरात सप्त धातु निर्माण होतात त्यातील रेत, वीर्य हे पुरुषाचे सार - नवीन जीव जन्माला येतो

(८) स्त्री
अष्टम: खंड - स्त्री ही आग्नि । उपस्थ ही समिधा । तिला प्रसन्न करण्यासाठी केलेल्या क्रिया - धूम । योनि - ज्वाला संमागम क्रिया - अंगारे । जे मिळते ते सुख म्हणजे ठिणग्या. ते क्षणिक असते

www.madhaveeraghuveer.com

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे
जाया गृहद्वारे जनः श्मशाने।
देहश्चितायां परलोकमार्गे
कर्मानुगो गच्छति जीव एकः॥

JULY
30
TUESDAY

आषाढ कृ. ८ संवत २०६९
मंगळवार ३०/७/२०१३

JUNE 2013						
S	M	T	W	T	F	S
30						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26	27	28	29

श्रद्धेची आहुति— सोमाची—पर्जन्याची-अन्नाची व शेवटची पाचवी रेताची आहुति दिल्यानंतर त्याला पुरुष ही संज्ञा प्राप्त होते.

देह त्यागानंतर पुन्हा जन्म घेईपर्यंतचा प्रवास या पंचाग्निविद्येत सांगितला आहे. त्याकाळी यज्ञप्रधान संस्कृति असल्याने यज्ञाच्या रूपकाने ही विद्या सांगितली आहे.

(९)

नवम खण्ड

इति तु पञ्चम्याम् आहुतौ आपः पुरुषवचसः भवन्ति इति स उल्बावृतो गर्भो दश वा नव वा मासानन्तः शयित्वा यावत् वा अथ जायते॥१॥

अशाप्रकारे पाचवी आहुति दिल्यावर आप नर पुरुष म्हणून घेतो. पुरुषाच्या शुक्राचा व स्त्रीबीजाचा संयोग होऊन जो गर्भ निर्माण होतो तो वारमध्ये गुंडाळलेल्या स्थितीत ९/१० महिने पडून रहतो. मग तो मूल म्हणून जन्माला येतो.

अशा प्रकारे आरुणीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे राजाने यज्ञविधीच्या रूपकातून दिली.

मृत्युनंतर कुठे जाते —— द्युलोकात / अंतरिक्षात.

या सर्व देहाच्या पारलौकिक क्रियांचे, गर्भावस्थेचे, जन्माचे वर्णन करण्यामागे वैराग्य उत्पन्न व्हावे अशीच इच्छा असावी.

स जातो यावदायुषं जीवति -------- एवैतो यतः सम्भूतो भवति॥

अशा प्रकारे जन्मलेला तो जीव आयुष्य असेपर्यंत इथे जगतो. पुन्हा मृत्युनंतर त्या प्रेताला गति मिळण्यासाठी अग्नि देतात. त्या अग्नि बरोबर जाऊन पंचाग्नि बरोबर पुन्हा जन्म घेतो. जन्मभर केलेल्या कर्मानुसार त्याला गति मिळते. त्या दिशेने अग्नि त्याला घेऊन जातो.

© www.madhavveeraghurear.com

With Best Compliments From

दशम खण्ड। (१०)

तद्य इत्थं विदुः। ये च इमे अरण्ये श्रद्धा तप इत्युपासते ते अर्चिषम् अभिसंभवन्ति अर्चिषः अहः अह्नः आपूर्यमाण पक्षम् आपूर्यमाणपक्षात् यान् षट् मासान् उदङ् एति तान् मासान् मासेभ्यः संवत्सरं संवत्सरात् आदित्यं आदित्यात् चन्द्रमसं चन्द्रमसः विद्युतं तत् पुरुषः अमानवः सः एनान् ब्रह्म गमयति एषः देवयानः पन्थाः इति॥ १॥

जे कोणी ही वर वर्णन केलेली विद्या (पंचाग्निविद्या) जाणतात अरण्यामध्ये तिची श्रद्धेने उपासना करतात, तप करतात, ते मृत्युनंतर अर्चिराभिमानी देवतेला प्राप्त होतात. तिथून दिवसाभिमानी देवतेकडे, मग शुक्लपक्षाच्या देवतेकडे, त्यानंतर उत्तरायणाभिमानी ,, , नंतर संवत्सराभिमानी ,, ,, आदित्याकडे — चंद्राकडे — विद्युत — तिथून अमानवी पुरुषाला प्राप्त होऊन नंतर ब्रह्माकडे नेले जातात. हाच देवयान पंथ.
थोडक्यात ही विद्या जाणणारा देवयान मार्गाने ब्रह्मापर्यंत पोहोचतो. अग्निर्ज्योतिरहः शुक्लः ----- ब्रह्म ब्रह्मविदो जनाः॥

परंतु जे अरण्यात न जाता गृहस्थाश्रमात राहून इष्टापूर्त कर्मे करतात. दान करतात ते धूम्राभिमानी देवतेला, रात्रिअभिमानी देवतेला, कृष्णपक्षाभिमानी देवतेला, दक्षिणायनाभिमानी देवतेला प्राप्त होतात. ते संवत्सराभिमानी देवतेकडे जात नाहीत.

मासेभ्यः पितृलोकं पितृलोकात् आकाशम् आकाशात् चन्द्रमसं एषः सोमः राजा तत् देवानाम् अन्नं तं देवाः भक्षयन्ति ॥४॥

दक्षिणायनातील सहा मासांकडून ते पितृलोकात, मग आकाशात, मग चंद्रलोकात जातात तेथे चंद्रमा राजा सोम आहे. तो देवतांचे अन्न आहे. देव त्याचे भक्षण करतात.

With Best Compliments from

© www.madhaveeraghuveer.com

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन॥

चंद्रामध्ये अमृत असते. पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत देव चंद्रातील अमृत सेवन करतात. ∴ तो कमी कमी होऊन अमावस्येला नाहीसा होतो. व पुन्हा अमृताने भरतो.

गृहस्थाश्रमी लोक या धूम्रमार्गाने जाऊन चंद्रलोकापर्यंत पोहोचतात व देवांचे अन्न होतात. त्यांनी विवेकाची उपासना केली नसली तरी दुष्कर्मे केलेली नसतात. समाजोपयोगी कामे, दानधर्म केले असल्याने त्या पुण्याच्या बळावर ते चंद्रलोकापर्यंत पोहोचतात. मात्र ब्रह्मापर्यंत जाऊ शकत नाहीत. त्यांना परत फिरावे लागते.

इथे अन्न म्हणजे उपभोगाची सामग्री आहे.

तस्मिन् यावत् संपातम् उषित्वा ------ धूमो भूत्वा अभ्रं भवति ॥५॥

त्या चंद्रमंडळात ते कर्माचा क्षय होईपर्यंत राहतात. मग त्याच मार्गाने परत येतात. (पुण्य सरेपर्यंत राहतात.) तिथून ते आकाशात, मग वायूत, धूमात येतात. मग तो अभ्र बनतो.

अभ्रं भूत्वा मेघो भवति ------ रेतः सिच्यति तद्भूय भवति ॥६॥

अभ्र होऊन, त्यात पाणी भरून तो मेघ होतो, बरसतो व मग पृथ्वीवर साळी, यव, गहू, ज्वारी, बाजरी, तीळ, उडीद इ० रूपांनी उगवतो. अशा प्रकारे यातून बाहेर पडणे कठीण आहे. त्यानंतर जो कोणी हे अन्न खातो, त्या अन्नाचे सप्त धातू (वीर्य) बनून जेव्हा हे वीर्य स्त्रीयोनिमध्ये रुजते. त्यातून त्या त्या प्रकारचा जीव (कुत्रा, मांजर, गाय, हत्ती) जन्माला येतो.

भाग - २०८

20 Jan. 2020

तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिम् आपद्येरन् ब्राह्मणयोनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वा अथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिम् आपद्येरन् श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चाण्डालयोनिं ॥

त्या अनुशयी जीवांमध्ये जे चांगल्या आचरणाचे असतात ते शीघ्र उत्तम गतीला (वरच्या योनीला) प्राप्त होतात. ब्राह्मण - क्षत्रिय - वैश्य त्यांना पुढचा जन्म उत्तम वर्णात मिळतो. पण अशुभ आचरण करणाऱ्यांना मात्र (कपूयचरणा) नीच योनि (श्व, डुक्कर, चांडाळ) प्राप्त होते.

अथ एतयोः पथोः न कतरेण च न तानि इमानि क्षुद्राणि असकृत आवर्तीनि भूतानि भवन्ति । जायस्व म्रियस्व इति एतत् तृतीयं स्थानं तेन असौ लोकः न सम्पूर्यते तस्मात् जुगुप्सेत । तत् एषः श्लोकः ॥८॥

जे जीव पंचाग्निविद्या प्राप्त करत नाहीत. इष्टापूर्त कर्मे किंवा दानधर्म न केल्याने ते क्षुद्र जीव वारंवार भूत बनतात. 'जन्म घ्या व मरा' हेच यांचे तृतीय स्थान असते. हे चक्र सतत सुरुच असते. अशा या पुन्हा पुन्हा जन्ममृत्युच्या चक्राची खरं तर घृणाच करायला पाहिजे. आणि त्यामुळेच तो वरचा परलोक ओसंडून वाहत नाही.

स्तेनो हिरण्यस्य सुरां पिबंश्च गुरोस्तल्पमावसन् ब्रह्महा च एते चत्वारः च पञ्चमः तैः आचरन् इति ॥९॥

ब्राह्मणाचे सोने चोरणारा, ब्राह्मण असून दारू पिणारा, गुरुपत्नीशी समागम करणारा व ब्राह्मणाची हत्या करणारा हे चार जण पतित आहेत व त्यांच्याशी व्यवहार करणारा किंवा यांची संगत करणारा पाचवा, तोहि पतित आहे.

अथ ह य एतानेवं पञ्चाग्नीवेद न सह तैः अपि आचरन् पाप्मना न लिप्यते । स: शुद्ध: पूत: पुण्यश्लोक: भवति । य एवं वेद य एवं वेद ॥१०॥

परंतु या पंचाग्निंना जो याप्रमाणे जाणतो त्याने जरी या पंचमहापातकी लोकांशी व्यवहार केला तरी तो पापाने लिप्त होत नाही. तो शुध्द, पवित्र व पुण्यलोकय राहतो. म्हणजेच विचारलेल्या या पाचही प्रश्नांची उत्तरे ज्याला ठाऊक आहेत तो पापी बनत नाही. शुध्द पवित्रच होतो व तसाच राहतो.

– एकादश खण्ड – (११)

प्राचीनशाल औपमन्यवः सत्ययज्ञः पौलुषिः इन्द्रद्युम्नः भाल्लवेयः जन शार्कराक्ष्यः बुडिल आश्वतराश्विः ते ह एते महाशाला महाश्रोत्रियाः समेत्य मीमांसांचक्रुः को नः आत्मा किं ब्रह्म इति ॥१॥

उपमन्युचा पुत्र प्राचीनशाल, पौलुषिचा पुत्र सत्ययज्ञ, भल्लाविचा पुत्र इंद्रद्युम्न, शर्कराक्षाचा पुत्र जन, अश्वतराश्वाचा पुत्र बुडील असे सगळे महागृहस्थ व महाश्रोत्रिय एकदा एकत्र आले व आपापसात विचार विनिमय करू लागले. आपला आत्मा कोण आहे? ब्रह्म काय आहे?

© www.madhaveeraghuveer.com

प्रश्नोपनिषद - पिप्पलाद ऋषींकडे असेच ६ शिष्य ६ प्रश्न घेऊन आले होते.

S	M	T	W	T	F	S
	1	2	3	4	5	6
7	8	9	10	11	12	13
14	15	16	17	18	19	20
21	22	23	24	25	26	27
28	29	30	31			

त्यांच्या चर्चेतून काहीच निष्पन्न होईना तेव्हा त्यांनी अन्य जाणकाराकडे जाण्याचा निर्णय घेतला.

ते ह सम्पादयाञ्चक्रुः उद्दालको वै भगवन्तोऽयमारुणिः संप्रति इमम् आत्मानं वैश्वानरम् अध्येति तं हन्ताभ्यागच्छाम इति तं हाभ्याजग्मुः॥२॥

त्या सर्व पूजनीय ऋषींनी असा निर्णय केला की संप्रति अरुणांचा पुत्र उद्दालक हा वैश्वानराचे अध्ययन करत आहे, वैश्वानर उपासना करत आहे. आपण त्यांच्याकडे गेलो तर आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. ते सर्व " गेले.

स ह सम्पादयाञ्चकार प्रक्ष्यन्ति माम् इमे महाशालाः महाश्रोत्रियाः तेभ्यो न सर्वमिव प्रतिपत्स्ये हन्ताहम् अन्यम् अभ्यनुशासानि इति॥३॥

उद्दालक ऋषींनी असा विचार केला की हे महाशाल, महाश्रोत्रिय आम्हाला प्रश्न विचारतील. त्यांची उत्तरे मला येत असली तरी मला नाही वाटत की मी त्यांना चांगल्या प्रकारे सांगू शकेन. कारण त्यांना वैश्वानराबद्दल जाणून घ्यायचे आहे, आणि शेवटी आत्मा आणि ब्रह्म एकच तर आहेत. पण हे समजावून घेण्यासाठी मी दुसऱ्या कुणा उपदेशकाचे नाव सुचवतो हे बरे!

तान् ह उवाच अश्वपतिः वै भगवन्तः अयं कैकेय संप्रति इमम् आत्मानं वैश्वानरं अध्येति तं हन्ताभ्यागच्छाम इति ते ह अभ्याजग्मुः॥४॥

उद्दालक आरुणि त्या ब्राह्मणांना म्हणाले — हे पूजनीय श्रेष्ठ ब्राह्मणांनो, सध्या केकयाचा पुत्र अश्वपति त्या वैश्वानर आत्म्याची उपासना करत आहेत. आपण त्याच्याकडे जाऊ या.
तेव्हा ते सर्वजण अश्वपतीकडे गेले.

तेभ्यो ह प्राप्तेभ्यः पृथगर्हाणि कारयाञ्चकार स ह प्रातः संजिहान उवाच न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपो नानाहिताग्निर्नाविद्वान्न स्वैरी स्वैरिणी कुतो यक्ष्यमाणो वै भगवन्तोऽहमस्मि यावदेकैकस्मा ऋत्विजे धनं दास्यामि तावद्भगवद्भ्यो दास्यामि वसन्तु भगवन्त इति ॥५॥

तिथे आलेल्या त्या सर्वांचे राजा अश्वपतीने स्वागत केले. त्यांचे सत्कार केले. सकाळी त्यांच्याजवळ जाऊन नम्रतेने राजा म्हणाला, "माझ्या जनपदामध्ये चोर नाहीत, कंजूष (धन असून दान न देणारा) नाही, मद्यपी नाही. अग्निहोत्र न चालवणारा नाही. अविद्वान, मूर्ख नाही. स्वैराचारी पुरुष नाही तर स्वैरिणी स्त्री कुठून असणार? हे भगवन् मी यज्ञ करत आहे. एका ऋत्विजाला मी जेवढी दक्षिणा देतो तेवढे धन मी तुम्हा प्रत्येकाला देईन. आपण इथे (आनंदात) रहावे.

करिता
ते ह ऊचुः येन ह एव अर्थेन पुरुषः चरेत तं ह एव वदेत् इमं वैश्वानरं आत्मानम् एव संप्रति अध्येषि तं एव नः ब्रूहि इति॥

त्या उद्देशाने (ज्यासाठी) पुरुष कुठे जातो, त्या प्रयोजनाबद्दल पुरुषाने प्रथम बोलावे. संप्रति तू वैश्वानर आत्म्याचे ध्यान करतोस. त्याला चांगल्या प्रकारे जाणतोस. तर तू आम्हाला सांग. त्या वैश्वानराबद्दल जाणून घ्यायला आम्ही उत्सुक आहोत, इथे आलो आहोत.

तान्ह ह उवाच प्रातः यः प्रतिवक्तास्मि इतीते ह समित्पाणयः पूर्वाह्णे प्रतिचक्रमिरे तान्ह अनुपनीय एव एतत उवाच ॥७॥

तो राजा मग त्यांना म्हणाला, " ठीक आहे. उद्या मी तुमच्या प्रश्नांचे उत्तर देईन. मग दुसऱ्या दिवशी सकाळी ते राजाजवळ हातात समिधा घेऊन गेले. त्यांचा उपनयन संस्कार न करताच राजाने त्यांना ही (वैश्वानर विद्या) अशा प्रकारे सांगितली.

परब्रह्म या सर्व सृष्टीत, विश्वात भरून राहिला आहे. तो प्रत्येकात प्रवेश करून स्थिर झाला आहे. अशा या विश्वात भरलेल्या विश्वंभराला इथे वैश्वानर म्हटले आहे. एकदा का त्याला जाणले म्हणजे विश्व जाणल्यासारखे होईल. म्हणजेच ब्रह्माला जाणल्यासारखे होईल. म्हणून वैश्वानर आत्म्याची उपासना या खंडात सांगितली आहे. त्याला संतुष्ट करण्यासाठी प्रतीकरूपाने भोजनापूर्वी वैश्वदेवाला नैवेद्य दाखवण्याची प्रथा होती.

या अध्यायात महाशाल असणाऱ्या विद्वानांची ज्ञानपिपासा दिसून येते आणि ज्ञानप्राप्तीच्या मार्गात वर्णभेदाचा अडथळा येत नाही हे सांगितले आहे. ब्राह्मण - शिष्य | क्षत्रिय - गुरु |

© www.madhuraveeraghuveer.com